मोगल मातबरखानाची अप्रकाशित पत्रे

(१६८८ - १७०५)



सेतुमाधवराव पगडी

जय शिवराय,

राज्य मराठी विकास संस्थेने Internet Archive वर "नवभारत" या मासिकाच्या ९००+ PDF प्रती उपलब्ध करून दिल्या आहेत. या मासिकांमध्ये मराठा इतिहासाशी संबंधित अनेक महत्त्वाचे लेख आणि कागदपत्रे समाविष्ट आहेत. ही PDF File "मराठा इतिहास" अभ्यासक आणि वाचकांसाठी उपयुक्त ठरावी, याच उद्देशाने ती उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमामध्ये आमचा कोणताही वैयक्तिक लाभ किंवा व्यावसायिक हेतू नाही. सर्व श्रेय हे राज्य मराठी विकास संस्था आणि "नवभारत" या मासिकाचे आहे. नियमानुसार या PDF प्रतींचा कोणत्याही व्यावसायिक कामासाठी उपयोग करता येऊ शकत नाही. त्यामुळे आम्ही आमचे नाव उघड करू शकत नाही. आमचा उद्देश एकच आहे—मराठा इतिहासाशी संबंधित अप्रसिद्ध लेख आणि महत्त्वाची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे, जेणेकरून ती सहज उपलब्ध होईल आणि त्यांचा शोध घ्यायची गरज भासणार नाही.

धन्यवाद

मातबरखानाची पत्रे :

मातबरखान हा मोगलांचा सरदार होता. संभाजी महाराजांच्या कालाच्या शेवटी नाशिक, बागलाण, उत्तर कोकण येथील किले घेण्यात त्याने मोठा पराक्रम गाजवला. त्याने बादशाहाला व इतर मोगल सेनाधिकाऱ्यांना लिहिलेली काही पत्रे उपलब्ध आहेत. मातबरखानाचा चिटणीस जेठमल याने ही पत्रे व खानाच्या पराक्रमाची हकीगत एकत्रित करुन 'कारनामा' नावाचा ग्रंथ लिहिला. या पत्रांपैकी काही पत्रांचा अनुवाद श्री. पगडी यांनी मराठीतील 'नवभारत' या मासिकात प्रसिध्द केला आहे. संभाजी महाराज व राजाराम महाराज यांच्या कालातील मोगल-मराठा संघर्ष समजून घेण्यासाठी या पत्रांचा उपयोग होतो.

नवभारत

वर्ष २२ वे] सप्टेंबर १९६९ [अंक १२

व्रत-विचार : : : : : ले. महात्मा गांधी
सरमा-पणि संवाद : : : : प्रा. उषा वि. करंवेळकर
राष्ट्राच्या अभ्युदय व उन्नतीसाठी वनसंवर्धन श्री. नाशिकराव तिरपुडे,
: : : : वनमंत्री, महाराष्ट्र राज्य.
मोगल मातबरखानाची अप्रकाशित पत्रे (१६८८-१७०५) श्री सेतु माधवराव पगडी
मराठी साम्राज्यसत्तेमागील हेतू : मी व माझे टीकाकार - श्री. सदाशिव आठवले
विज्ञान आणि तत्त्वज्ञान श्री. मानवेंद्रनाथ रॉय, अनुवादक- वा. रं. सुंठणकर
लो. टिळकांच्या स्वराज्य-आंदोलनात कॉंग्रेसचे स्थान तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी
पाश्चिमात्यांचे साहित्यशास्त्र
उष:काल (पूर्वार्ध) : : : : डॉ अ. ना. देशपांडे
'विवेकसिंधू 'तील प्रधान प्रतिपाद्य : राजयोग डॉ. श्री. रं. कुलकर्णी
' महाकवि चंदबरदाई ' : : : : प्रा. रा. तु. भगत

वार्षिक वर्गणी ९ रु.] [किरकोळ अंक १ रु.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

नवभारत
७५
अमृतमहोत्सवी
वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग

राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.**

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, यांचे मासिक

वर्ष बाविसावे
अंक बारावा

नवभारत

सप्टेंबर
१९६९

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत)

संपादक-मंडळ

प्रा. वि. म. बेडेकर—प्रा. गोवर्धन पारीख का. संपादक

व्रतविचार	ले. महात्मा गांधी	१–८
सरमा-पणि संवाद	प्रा. उषा वि. करंबेळकर	९–१४
राष्ट्राच्या अभ्युदय व उन्नतीसाठी वनसंवर्धन	श्री. नाशिकराव तिरपुडे, वनमंत्री, महाराष्ट्र राज्य.	१५–१७
मोगल मातबरखानाची अप्रकाशित पत्रे (१६८८–१७०५)	सेतु माधवराव पगडी	१८–२५
मराठी साम्राज्यसत्तेमागील हेतू : मी व माझे टीकाकार	श्री. सदाशिव आठवले	२६–२९
विज्ञान आणि तत्त्वज्ञान	श्री. मानवेंद्रनाथ रॉय, अनुवादक– बा. रं. सुंठणकर	३०–४०
लो. टिळकांच्या स्वराज्य-आंदोलनात कॉंग्रेसचे स्थान	तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी	४१–४५
पाश्चिमात्यांचे साहित्यशास्त्र उषःकाल (पूर्वार्ध)	डॉ. अ. ना. देशपांडे	४६–५६
‘ विवेकसिंधू ’तील प्रधान प्रतिपाद्य : राजयोग	डॉ. श्री. रं. कुलकर्णी	५७–६२
‘ महाकवि चंदबरदाई ’	प्रा. रा. तु. भगत	६३–६४

वार्षिक रु. ९ सहामाही रु. ५ अंकास रु. १

हे मासिक श्री. म. शं. साठे यांनी दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई येथे छापून प्रा. वि. म. बेडेकर यांनी प्राज्ञपाठशाळामंडळ वाई यांचेकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

पत्रव्यवहाराचा पत्ता : १ संपादकीय : कार्यकारी संपादक, ‘ नवभारत ’ मासिक,
‘ गणेश भुवन ’ २७६, तेलंग रोड, माटुंगा– मुंबई १९

२ व्यवस्थापकीय : व्यवस्थापक, ‘ नवभारत ’ मासिक,
C/o प्राज्ञ प्रेस, वाई (जि० सातारा)

३ चौकशी : श्री. वा. वि. कोनकर
१८८ एफ्, भीमरावबाडी, मुंबई २
फोन नं. ३५४८५४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

श्री. सेतु माधवराव पगडी

मोगल मातबरखानाची अप्रकाशित पत्रे (१६८८--१७०५)

औरंगजेबाचे मराठ्यांच्या विरुद्ध युद्ध चालू असता मातबरखान नावाचा त्याचा एक अधिकारी हा इ. स. १६८७–८८ च्या सुमारास नाशिक येथे फौजदार म्हणून काम करीत होता. पुढील एक दोन वर्षांत त्याने मराठ्यांचे बागलाणातील किल्ले जिंकून घेतले. इ. स. १६८९ च्या मार्च महिन्यात संभाजीराजाचा वध झाला. त्याच दिवशी मातबरखान हा औरंगजेबाच्या हुकुमाने कोकणात उतरला. त्याने कल्याण, भिवंडी, पेण, पनवेल इत्यादि गावे आणि माहुली, प्रवाळगड इत्यादि किल्ले जिंकून घेतले. इ. स. १६८९ मध्ये औरंगजेबाने त्याच्याकडे कोकणातील कल्याणभिवंडी आणि घाटावरील नाशिक सिन्नर हा प्रदेश दिला. पुढील सोळा वर्षे मातबरखानाने या भागाचा कारभार केला. या काळात त्याचे पोर्तुगीज आणि मराठे यांच्याशी युद्धाचे प्रसंग आले. इ. स. १७०० च्या पुढे मराठ्यांचा जोर हळूहळू वाढू लागला. कल्याण प्रांताच्या उत्पन्नापैकी काही रकम दरवर्षी मराठ्यांना त्याने देण्याचे कबूल केले आणि आपली सत्ता त्याने टिकवून धरली. मातबरखानाचा मृत्यु इ. स. १७०५ मध्ये झाला. त्याची कबर कल्याणला शेणाळी तलावाच्या काठावर आहे. कबरीवर मोठा दर्गा बांधण्यात आला आहे. मातबरखानाची बायको त्याच्या हयातीत वारली. तिच्या कबरीवर त्याने ही वास्तु उभी केली. पुढे त्याचा मृत्यु झाल्यानंतर त्यालाही तेथेच दफन करण्यात आले. कल्याणला मातबरखानाने स्वतःसाठी वाडा, सरकारी इमारती, बागा, मशिदी इत्यादि तयार केल्या. आज एक मशीद आणि शेणाळी तलावाच्या काठावरील त्याच्या कबरीवरची इमारत हीच तेवढी शिल्लक आहेत.

मातबरखानाच्या मृत्यूनंतर त्याचा आप्त आणि शिवकालीन कल्याणचा सुभेदार मुल्ला अहमद याच्या भावाचा मुलगा जैनुद्दीन अली हा कल्याणचा मोगल अधिकारी म्हणून काम करू लागला. इ. स. १७१९ मध्ये मराठ्यांनी मोगल बादशहाकडून चौथाई सरदेशमुखी आणि स्वराज्य यांच्या सनदा मिळविल्या त्यात कल्याण प्रांत मराठ्यांकडे आला. माहुली, कर्नाळा इत्यादि किल्ले मात्र मोगलांच्या ताब्यात होते. इ. स. १७३५ पर्यंत मराठ्यांनी ते किल्लेही हस्तगत केले आणि अशा रीतीने मोगलांची कोकणातील सत्ता संपुष्टात आली.

जेठमल नावाचा एक हिंदु अधिकारी मातबरखानाचा चिटणीस (मुन्शी लेखक) म्हणून काम करीत होता. तो फार्शी भाषेचा मोठा पंडित आणि कवि होता. त्या काळात मोगल सुभेदाराची पत्रे अलंकारिक फारसी भाषेत लिहिण्यात तज्ञ झालेला फारसी मुन्शीचा वर्ग निर्माण झाला होता. बादशहाकडे किंवा इतर वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविण्याचे रिपोर्ट, पत्रे, मुलखटे, अभिनंदन इत्यादि मजकूर हे मुन्शी उत्तम आणि दरबारमान्य भाषेत लिहून काढीत. मुख्य मजकूर अर्थात अधिकाऱ्याचा असे. जेठमलने मातबरखानाकडून निरनिराळ्या व्यक्तींकडे गेलेली (आणि स्वतः उत्कृष्ट भाषेत सजविलेली) पत्रे एकत्रित केली. त्याला जोडून त्याने मातबरखानाची संक्षिप्त हकीकत लिहिली. आणि या ग्रंथाचे नाव कारनामा (कर्तबगारीची हकीकत) असे ठेवले. इ. स. १७०५ नंतर जेठमल पुढे कोठे गेला कळत नाही. मातबरखान मेल्यानंतर त्याचा मुलगा अबू मुहंमद याला वजीर मुनीमखान याचे दुखवट्याचे पत्र आले. त्याला अबू मुहंमद तर्फे जे उत्तर गेले त्याचा मसुदा जेठमलने केला आहे तो या ग्रंथात शेवटी दिला आहे.

वरील संग्रहातील पत्राची संख्या एकूण शंभर. त्यांचा काळ इ. स. १६८८ ते १७०५ हा आहे. या काळात मातबरखानाने मराठ्यांचे किल्ले घेतले, आणि जागजागी ठाणी बसविली. पोर्तुगीज हे मराठ्यांना आश्रय देतात म्हणून त्याने त्यांच्यावर हल्ला चढविला. पण पोर्तुगिजांनी वरिष्ठ मोगल अधिकाऱ्यांना लाच दिल्यामुळे औरंगजेबाने उलट मातबरखानाची कानउघाडणी केली. मराठ्यांच्या बरोबर मातबरखानाची धावपळीची लढाई सतत चालू होती. बादशहाच्या मन्सबीतून त्याचा खर्च भागेना. त्याने नवीन पथके तयार केली. लांच देऊन त्याने मराठ्यांचे किल्ले घेतले. बादशहाने त्याला या बाबतीत फार थोडी रकम दिली. मातबरखान कर्जबाजारी झाला. ही पत्रे पाहता मराठ्यांच्या युद्धापायी मोगल हे आर्थिक आणि लष्करी या दोन्ही

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

दृष्टीनी कसे जेरीस येऊ लागले होते याची कल्पना येईल. मला या फारसी ग्रंथाचे हस्तलिखित मिळाले त्यात दहा-बारा पाने गहाळ आहेत. पण एकंदरीत ग्रंथ मराठ्यांच्या इतिहासाभ्यासकास अतिशय उपयुक्त आहे. इ. स. १६८० ते १७०७ या कालखंडातील मोगल-मराठा संघर्षाची मराठी साधने फार थोडी आहेत ती पाहता या ग्रंथाची उपयुक्तता अधिकच जाणवते. पुढे ग्रंथाचा परिचय आणि निवडक फारसी पत्रांचा मराठी अनुवाद दिला आहे. जेठमलने वापरलेली अलंकारिक भाषा जशीच्या तशी अनुवादित न करता मुख्य मजकूर तेवढा दिला आहे.

संक्षिप्त अनुवाद

शिवाजीने दीर्घ परिश्रम करून किल्ले घेतले होते. त्यांची उत्तम व्यवस्था करून त्याने ते अभेद्य आणि अजिंक्य बनविले होते. असे जवळजवळ पन्नास किल्ले अल्पावधीत मातबरखानाने जिंकून मोगलसत्तेखाली आणले. औरंगाबादेच्या परिसरापासून समुद्रकिनाऱ्या-पर्यंत, विशेषतः जुंन्नर आणि तळकोकण या प्रदेशातून त्याने मराठ्यांना उठवून लावले. कल्याण आणि तळकोकणचे इतर परगणे हे वीस वर्षापासून मराठ्यांच्या आक्रमणाच्या पुरामुळे उध्वस्त होऊन गेले होते. त्यांना त्याने पुन्हा बसवून आबाद केले. त्याने इमारती बांधल्या, कालवे बांधले, बागा तयार केल्या आणि लोकांच्या स्मरणात राहतील अशी कामे केली. मातबर-खानाने बादशहाला वेळोवेळी अर्ज्या पाठविल्या आणि त्यांच्या उत्तरात बादशहाकडून फर्माने येत गेली, त्यांचा तपशील या ग्रंथात आढळून येईल.

या ग्रंथाचा लेखक मी जेठमल (कवितेतील नाव हिंदू) मातबरखानाच्या सरकारात मुन्शीच्या हुद्यावर होतो. मातबरखानाची माझ्यावर विशेष कृपा होती. म्हणून मी हा ग्रंथ लिहून त्याचे नाव “ कारनामा ” असे ठेवले आहे.

(१) पट्टा किल्ला जिंकल्याबद्दल औरंगजेबाकडे अर्जी (१६८८). हा सेवक मातबरखान अर्ज करतो की या सेवकाने काही दिवसापासून सुमारे एक हजार कोळी, भिल्ल आणि मावळे यांचे पायदळ पथक चाकरीत घेतले होते. मराठ्यांच्या ताब्यात असलेले पट्टा आणि इतर किल्ले यांच्या लगतच्या जमीनदारांना रकमा पुरविण्यात आल्या आणि त्यांना मन्सबी आणि इतर बक्षिसे यांची प्रलोभने दाखवून त्यांना बादशाही कृपेचे उमेदवार बनविण्यात आले. हरजी जाखडे याचे आणि तरतीबखान याचे आपसात वाकडे आले होते. त्यामुळे हरजी हा सिन्नर परगण्यातील सोना या आपल्या गावी जाऊन बसला होता. त्याला रोख रक्कम, घोडा, आणि शिरपाव ही दिली होती, उभे केलेले पथक त्याच्या दिमतीला देण्यात आले आणि पट्टा किल्ला जिंकून घेण्याच्या कामगिरीवर तो रवाना झाला. तो किल्ला घेण्याची योग्य संधी शोधीत होता पण ही मोहीम पार पडेना. त्याला कारण तरतीबखानाने निर्माण केलेल्या अडचणी होत.

या सुमारास बादशहांनी मला गुल्शनाबाद नाशिकच्या ठाणेदारीवर नेमले. मी हरजीची हरप्रकारे समजूत घातली. बादशहाच्या राज्यारोहणाच्या एक-तिसाव्या वर्षी (जुलूस एकतीस) रबिलावल महिन्याच्या सतरा तारखेस (अकरा जानेवारी १६८८) मी सरकारी सैन्य आणि माझी पथके किल्ला घेण्याच्या कामावर रवाना केली. रबिलावलच्या तेवीस तारखेस (सतरा जानेवारी) माझे सैनिक मध्यरात्रीच्या सुमारास दोर लावून किल्ल्याच्या तटावर चढले आणि त्यांनी किल्ला जिंकून घेतला. या मोहिमेत उभय पक्षापैकी जे मारले गेले आणि शत्रूपैकी जे कैद झाले त्यांचा तपशील पाठविण्यात येईल.

या मोहिमेसाठी मला पंचेचाळीस हजार रुपये कर्ज काढावे लागले. ती रक्कम मोहिमेत खर्च झाली आहे. आपल्या कृपेने अल्पावधीत इतर किल्ले जिंकून घेण्याची आशा बाळगून आहे. मुहंमद अफजल याला मी संगमनेरहून या मोहिमेसाठी बोलावून घेतले होते. त्याच्याबरोबर पट्टा किल्ल्याच्या किल्ल्या पाठवीत आहे. केशवदास बुंदेला याच्याबरोबर भगूर-(नाशिक जवळ) चा ठाणेदार गोविंदराव याचे निम्मे पथक देऊन केशवदासला तूर्त किल्ला सांभाळयास सांगितले आहे. किल्ल्याच्या पायथ्याच्या इलाख्यावर मी गोविंदरावची फौजदार म्हणून नेमणूक केली आहे. त्याचा पुतण्या राजाराम याची नेमणूक भगूरचा ठाणेदार म्हणून करावी. केशवदास हा शिपाईगडी असून कामाचा मनुष्य आहे. त्याची मन्सब वाढवावी. लवकरच चांगली मन्सब असलेल्या किल्लेदाराची आणि हशमाची तैनात व्हावी ही विनंति.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

हा किल्ला मोठा असून याच्या भोवती मराठ्यांचे किल्ले आहेत. या किल्ल्याच्या संरक्षणासाठी कमीत कमी दोन हजार तोफची (बंदुकधारी, मस्केटीयर) लागतील. त्यात पाठविण्यात आले तर योग्य होईल. नसल्यास मला आज्ञा करावी म्हणजे दोन हजार पायदळ नव्याने उभारून मी किल्ल्याची खात्रीलायक व्यवस्था ठेवीन. तोफल्यांना औरंगाबादच्या सरकारी खजिन्यातून दोन महिन्याचा पगार आगाऊ देण्याची व्यवस्था व्हावी.

(२) औरंगजेबाचे फर्मान मातबरखानाच्या नांवे (१६८८). तुमची अर्जी (अर्जदाश्त) मिळाली. तीतील मजकूर आमच्या नजरेस आला. तुमची कामगिरी पसंत केली जात आहे. तुम्हाला खिलतीची वस्त्रे, एक हत्ती, वीस हजार रुपये रोखही देण्यात येत आहेत. तुमच्या मन्सबीत पांचशेची वाढ करण्यात येत आहे. तुमची विनंति आम्ही मान्य करतो. त्याचा तपशील बख्शीउल्मुल्क बहरामखान याच्या पत्रावरून कळून येईल. मुहंमद अफजलच्या मन्सबीत वाढ करण्यात आली आहे. बादशाही कृपेबद्दल तुम्ही आभारी राहावे. आणि बादशाहाची अधिकाधिक सेवा करावी. त्र्यंबकचा किल्ला घेण्याचा हरप्रकारे प्रयत्न करावा. त्याचे चीज होईल हे जाणावे.

(३) मातबरखानाची बादशहास अर्जी (१६८८). हा सेवक गुल्शनाबाद नाशिकच्या ठाणेदारीवर नेमणूक झाल्यानंतर आणि पट्टा किल्ला जिंकून घेतल्यानंतर, कलंग, बाबहार, तबाका व रोहतगड हे किल्ले जिंकून घेण्याच्या तयारीत होता. (कुलंग इगतपुरीहून नऊ मैल आहे.) रोहतगड हा घाटाच्या माथ्यावर आहे. कुलंगच्या किल्ल्यात मराठ्यांनी आपले ठाण मांडले होते. त्यांनी तेथे मोठ्या इमारती बांधल्या होत्या. मी कोळी, भिल्ल, आणि मावळे यांची पथके चाकरीत घेतली आणि त्यांना कुलंगच्या किल्ल्याकडे पाठविले. माझी पथके जवळच्या दऱ्यातून दबा धरून बसली. चौकी पहारे ढिले झाले की किल्ला ताब्यात घ्यावा असा त्यांचा बेत होता. पण कुलंगचा किल्ला मजबूत आहे. दौलताबादच्या किल्ल्याप्रमाणेच हा डोंगरी किल्ला चारपांचशे गज डोंगर तासून बनविला आहे. उघड हल्ला करून अगर दोर लावून किल्ल्यावर चढून तो जिंकून घेणे कठीण होते. या किल्ल्यातील सैनिकांची बायकामुले तळकोकणात प्रबळगड उर्फ मुरंजन किल्ल्याच्या पायथ्याच्या खेड्यातून राहात होती. त्यांना कैद करण्यासाठी मी एक हजार शिपाई पाठविले. त्यांनी प्रबळगडच्या पायथ्याच्या गावावर रात्री छापा घातला. या दंगलीत बरीच माणसे ठार अगर जखमी झाली. शेवटी अनेक बायकामुलांना कैद करून गुल्शनाबाद नाशिक येथे आणण्यात आले.

याच सुमारास किल्ल्याजवळच्या दऱ्याखोऱ्यात आमची माणसे दबाधरून बसली होती. त्यांनी काही किल्ल्यावर दोर लावून चढून अनेकांना ठार मारले. आणि कित्येकांना किल्ल्यावरून खाली दरीत ढकलून दिले. हे पाहून किल्ल्यावरचे लोक घाबरले. त्यांची बायकामुले आमच्या कैदेत सापडली होती. ते आम्हाला शरण आले आणि किल्ले आमच्या हवाली करण्याची त्यांनी तयारी दाखविली. त्यांना योग्य बक्षिसीची आणि मानमरातबाची आश्वासने देण्यात येऊन किल्ले ताब्यात घेण्यात आले. त्याच्या किल्ल्या पाठविण्यात आल्या आहेत. त्या आपल्या पाहाण्यात येतील.

यावेळी या सेवकाने किल्ले आउंधा, किल्ले कवनी, किल्ले हरीशगड, किल्ले त्रिंगलवाडी, किल्ले मदनगड, आणि किल्ले मोरदंत यांना वेढे घातले आहेत. परमेश्वर करील तर आपल्या कृपेने हे किल्ले मी अल्पावधीत जिंकून घेईन. त्यानंतर मी त्र्यंबकचा किल्ला जिंकून घेण्याचा प्रयत्न करीन. वरील किल्लेदारांना मी आश्वासने दिली आहेत. ती मान्य व्हावीत. म्हणजे या सेवकावर त्यांचा विश्वास बसेल. जिंकून घेतलेल्या किल्ल्यावर किल्लेदार, यांच्या नेमणुका व्हाव्या. हशम आणि रसद ही पाठविण्यात यावी. म्हणजे किल्ल्याची समाधानकारक व्यवस्था होईल. आणि त्यांच्या सुरक्षितेची खातर जमा होईल.

(४) त्र्यंबकचा किल्ला जिंकून घेतल्याची अर्जी (१६८९). त्र्यंबकच्या किल्ल्याला मी सहा महिन्यापासून वेढा घातला होता. किल्ल्याभोवती मी चौक्या बसविल्या होत्या. सहा महिन्यापासून किल्ल्याच्या लोकांना येजा करणे मुष्कील झाले होते. किल्ल्यात रसदेचा एक दाणा पोहोंचू नये अशी मी व्यवस्था केली होती. यामुळे किल्ल्यातील लोक हवालदील झाले. त्यांनी शरण येण्याची तयारी दाखविली.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मोगल मातबरखानाची अप्रकाशित पत्रे

गुल्शनाबाद नाशिकच्या ठाण्यात आमचे सैन्य थोडे होते. आणि या भागात मराठयांच्या हालचाली सुरु झाल्याच्या बातम्या पसरल्या. ही परिस्थिती पाहून मी त्र्यंबकच्या किल्लेदारांना बादशाही कृपेची आश्वासने दिली. जुलूस बत्तीस रबिलावल महिन्याच्या सव्वीस तारखेस (आठ जानेवारी १६८९) त्र्यंबक किल्ल्याचे अधिकारी तेलंगराव आणि श्यामराज हे किल्ल्यावरून खाली उतरले. आपल्या कृपेने त्र्यंबकचा किल्ला आमच्या ताब्यात आला. तेलंगराव आणि श्यामराज यांना कोणत्या मन्सबी द्यावयाच्या याचा तपशील सोबतच्या यादीवरून दिसून येईल. त्यांची अर्जी आणि किल्ल्याच्या किल्ल्या या काका मन्सबदार याच्या भावाबरोबर पाठविल्या आहेत. त्या आपल्या पाहाण्यात येतील.

काका मन्सबदार आणि त्याचा मोठा भाऊ रघू यांनी यापूर्वी पट्टा आणि इतर किल्ले जिंकून घेण्यात चांगली कामगिरी बजावली. तिचा तपशील यापूर्वीच सादर करण्यात आला आहे. तो हुजुरात पोहोंचला नसावा. त्र्यंबक, आउंध, व हरीश हे किल्ले घेण्याच्या कामातही त्यांनी परिश्रम केले आहेत. बादशाही कृपेचे ते उमेदवार आहेत. किल्लेदारांना बक्षिसे आणि इतर बाबतींत जी आश्वासने दिली आहेत ती मान्य व्हावीत. यात माझा मान राहील आणि किल्लेदार आणि त्यांची जमात यांना उत्तेजन मिळेल.

साल्हेरचा किल्ला ताब्यात आणल्याबद्दल नेकनामखान आणि साल्हेरचा किल्लेदार असोजी यांना इनामे (बक्षिसे) आणि मन्सबी देण्यात आल्या तशाच माझ्याकडे पाठविण्यात याव्या म्हणजे काही रक्कम किल्लेदारांना (तेलंगराव आणि श्यामराज) देईन आणि उरलेल्या रकमेतून या मोहिमेत झालेले कर्ज फेडून टाकीन म्हणजे किल्लेदारांचा माझ्या शब्दावर विश्वास राहील. तेलंगराव आणि श्यामराज हे शत्रूचे मातबर नोकर असून पूर्वीपासूनचे फौजबंद सरदार आहेत. त्यांनी किल्ला आमच्या ताब्यात दिला हे मोठे चांगले काम केले. त्यांची कामगिरी पसंत असल्याचे फर्मान आणि त्यांच्या साठी खिलतीची उंची वस्त्रे पाठवावी. यामुळे त्या लोकांचा मान वाढेल आणि त्यांचा माझ्यावरील विश्वास दृढ होईल. या पुढे माहुलीचा किल्ला जिंकून घेण्याचे काम आहे. अता तिरकळू (?)चा किल्ला तेवढा या भागात घेण्याचा राहिला आहे. त्यालाहि मी वेढा घातला आहे. या किल्ल्याचे लोक त्र्यंबकच्या किल्लेदारांना काय मन्सबी मिळतात याची वाट पाहात आहेत. त्या मिळाल्या असे कळले की या किल्ल्याचे लोकही किल्ला आपल्या ताब्यात देतील.

त्र्यंबकच्या किल्ल्याच्या मोहिमेत औंगडचा किल्लेदार श्यामसिंग याचा मुलगा हरीसिंग याने आपल्या जमेतीनिशी कामगिरी केली आहे. त्याच्या बरोबर तीनशे स्वार आणि एक हजार पायदळ देऊन मी त्याला त्र्यंबकचा किल्ला सांभाळण्याच्या कामावर नेमले आहे. नवीन किल्लेदार नेमून येईपर्यंत तो हे काम सांभाळील. त्याच्या मन्सबीत पन्नास (जात) आणि पन्नासस्वार अशी वाढ करण्यात यावी. ही आशा तो बाळगून आहे.

किल्ल्याची खबरदारीने देखरेख करण्यासाठी किल्लेदार आणि हशम (पायदळ शिबंदी) यांची नेमणूक करण्यात यावी.

(५) औरंगजेबाचे फर्मान (फेब्रुवारी १६८९). मातबरखानाने जाणावे की तुमची अर्जी पोहोचली. आपण त्र्यंबकचा किल्ला जिंकून घेतला असून त्र्यंगलवाडीच्या किल्ल्याला वेढा घातला आहे असे तुम्ही कळविले आहे. त्र्यंबकच्या किल्ल्याच्या किल्ल्या तुम्ही पाठविल्या त्या आमच्या नजरेखालून गेल्या. तुमची कामगिरी पसंत करण्यात येत आहे. तुमच्या स्वतःच्या मन्सबीत (जात) पांचशेची वाढ करण्यात येत आहे. तुमच्या मन्सबी (स्वार) तील सहाशेस्वार हे बिनशर्त राहातील. तुमची पूर्वीची आणि आताची मन्सब मिळून तीन हजारी (दोन हजार जात आणि एक हजार स्वार दो अस्पा) होईल. तुम्हाला खिलतीचा पोशाख, झेंड्याचा मान आणि तीस हजार रुपये रोख देण्यात येत आहेत. याबद्दल तुम्ही आभार मानावे आणि प्रथम बालाघाटांतील किल्ले जिंकून घेण्याचा प्रयत्न करावा. त्यानंतर घाटाखालचे किल्ले जिंकून घ्यावे. त्र्यंबकची किल्लेदारी कदीमकुलीखान याजकडे देण्यांत आली आहे.

परमेश्वराच्या अथांग कृपेने मुकर्रबखानाने संगमेश्वराला पोहोंचून दुष्ट संभाजीला जिवंत पकडले आहे.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

कदीमकुलीखान तिकडे पोहोंचताच तुम्ही कोंकणांत उतरावे आणि माहुली आणि त्या भागांतील इतर किल्ले ताब्यांत आणावे. कल्याण भिवंडी वगैरे महालांत ठाणी बसवावी. आणि त्या जिल्ह्याचा बंदोबस्त तुम्ही करावा.

लवकरच एतिकादखान (हाच पुढे झुल्फिकारखान म्हणून प्रसिद्ध झाला) प्रचंड सैन्य घेऊन रायरी (रायगड)कडे जाण्यास निघेल आणि परमेश्वरकृपेनें तो किल्ला जिंकून घेईल. तुम्ही इतर बाबतींत जे लिहिलें आहे त्यांचे उत्तर बख्शी उत्मुल्क बहरामदं खानाच्या पत्रावरुन कळून येईल.

(६) मातबरखानाची अर्जी (१६८८).

फर्मान मिळालें. (येथे एक पान गहाळ झालें आहे). आज्ञेप्रमाणे करतो. कोंकणांत उतरून माहुली आणि इतर किल्ले घेण्याची शर्थ करीन. बालाघाटचे किल्ले घेण्यांत मी जिवाची पर्वा केली नाही. त्याचप्रमाणे घाटाखालचे किल्ले घेऊन तिकडील महालांचा बंदोबस्त करीन. बादशाही सेवेत मी काही कसूर करणार नाही.

काफर संभाजीला कैद केल्याचे ऐकून मी परमेश्वराचे आभार मानले. आपल्याला अशेच विजय मिळत राहोत.

मी तळ कोंकणांतील माहुली आणि इतर किल्ले जिंकून घेण्यास तयार आहे. गुल्शनाबाद (नाशिक) ठाण्यावर तैनात असलेले पथक एक हजार स्वाराहून अधिक नाही. बख्शींना आज्ञा करण्यांत यावी की पथकांची आणि सरंजामाची उणीव भरुन काढावी. रघू आणि काका मन्सबदार यांनी आपल्या जमेतीनिशी किल्ले जिंकून घेण्यांत निष्ठेची कामगिरी बजावली आहे. त्यांच्या मन्सबीत जी वाढ व्हावी म्हणून मी अर्जी केली तीच मुळी कमी आहे. ते अधिकाधिक बादशाही कृपेचे उमेदवार आहेत. त्यांच्यावर मन्सबी आणि इतर मानमरातब यांच्या द्वारे कृपा व्हावी. कारण पुढे कित्येक मन्सुबे आहेत. नाहीतर काका मन्सबदार आणि रघू यांचा विरस होईल.

शेख अब्दुल्ला हा एक साधुपुरुष आहे. मी किल्ल्यांच्या मोहिमेत गुंतलो असताना त्याच्या सेवेत हजर झालो. किल्ले जिंकले जातील म्हणून त्याने भाकीत केले. त्याप्रमाणे किल्ले माझ्या हातात आले. त्याचा अधिकार जाणून आणि त्याचे कुटुंब मोठे आहे हे पाहून त्याला मदत म्हणून मी त्याच्या मुलांना माझ्या पाटोदा महालाच्या जहागिरीतून तीनशे रुपये उत्पन्नाचा एक गाव दिला आहे. याबाबतीत आपल्याकडून सदहू खेडे इनाम म्हणून दिल्याचा फर्मान यावा अशी आशा तो बाळगून आहे. म्हणजे तो दौलतीचे अभिष्ट-चिंतन करीत धर्मकर्मे करीत राहील.

(७) मातबरखानाची अर्जी (१६८९ एप्रील).

आपण मीरहसन व इतर गुर्जदार यांच्याबरोबर फर्मान पाठवून आज्ञा केली होती की कोंकणात उतरुन माहुली घ्यावी आणि कल्याण भिवंडी प्रातांत ठाणी बसवून तेथील बंदोबस्त करावा. आपल्या आज्ञेप्रमाणे मी बतीस जुलूस एकोणतीस जमादिलावल रोजी (अकरा मार्च १६८९) गुल्शनाबाद (नाशिक) ठाण्यातून बाहेर पडलो. भोवतालच्या ठाणेदारांना बोलावून आणण्या-साठी गुर्जदार गेले होते. ठाणेदार येईपर्यंत मी माझ्या जवळ असलेल्या फौजेत तैनात झालेल्या मन्सबदारांना घेऊन तेथेच काही दिवस राहिलो. जमादिलानीच्या बावीस तारखेस (तीन एप्रील १६८९) मी पुढे निघून खोस्ती (घोटी) घाटावर पोहोंचलो. तेथे रजब महिन्याच्या पाच तारखेस (पंधरा एप्रील) गुर्जदार हे ठाणेदारांना घेऊन आले. तेथून मी घाट उतरलो. रजबच्या सात तारखेस (सतरा एप्रील १६८९) मी तरोड्याला आलो. तेथून माहुलीचा किल्ला सात कोसा-वर आणि कल्याण भिवंडी हे तीस कोसावर आहे. येथून मी मजल दरमजल करीत पुढे जात आहे. लवकरच कल्याणला पोहोंचून मी शत्रूचा मोड करण्याचा प्रयत्न करीन. कल्याण प्रांत उध्वस्त झाला आहे. तेथे पाणी आणि चारा यांचा तुटवडा आहे. ही हकीकत मी यापूर्वी कळविली आहे. ती आपल्यापर्यंत पोहों-चली असेल. अद्यापपर्यंत तोफखान्याची सामग्री आली नाही. दारुगोळा, बंदूकची, गोलंदाज, बाणदार, जंगल तोडणारे, पाणी पुरवणारे बेलदार इत्यादींची रवानगी झाली नाही. या प्रांतांत ठाणी बसविणे, आणि लहान गढ्या बांधणे इत्यादीसाठी वरील सामग्री अतिशय आवश्यक आहे. लवकर पाठविण्याची कृपा व्हावी म्हणजे वेळेवर कामी येईल.

धान्य वगैरे रसद पाठविण्या विषयी सुरतेच्या अधिकाऱ्यांना हुकुम व्हावा, हा प्रांत वैराण झाला आहे येथें धान्य मुळीच पिकत नाहीं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

माझ्याकडे जे सरकारी अधिकारी तैनात झाले आहेत त्यांची यादी सोबत पाठवीत आहे. पेठचा ज़मीनदार अब्दुलकरीम याला हुजुरांनीं आपल्याकडे बोलावून घेतलें आहे. अंकोल्याच्या ठाण्याचे पथक आणि बरेच मन्सबदार आले नाहींत. हुजुरांच्या तैनातींतील माणसे पाठविल्यास बरें होईल. मोठी मोहीम होणार आहे.

जयसिंग भोसले आणि निजामराव वगैरेंना जहागिरी नाहींत. त्यांच्यानें सैन्यांत टिकाव धरून राहाणे शक्य होणार नाहीं. सदर इसमांना जहागिरी देण्याबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांना आज्ञा व्हावी. बाकीची हकीकत मीर हसेन गुर्जदाराकडून कळेलच.

(८) मातबरखानाची अर्जी (१६८९ मे).

माहुलीहून जवळच घाटाच्या पायथ्याशी तरोडा हे गांव आहे. तेथें मी तळ दिल्याची हकीकत पूर्वीच्या अर्जीत कळविली आहे. तेथून निघून मी खर्डी या गांवी आलो. दुसऱ्या दिवशी मी तेथून निघालो. हेरांनीं बातमी आणली कीं माहुलीच्या किल्ल्यांतून मराठ्यांचें एक हजार पायदळ सैन्य बाहेर पडलें आहे. ज्या वाटेवरून आमचे लष्कर मोठ्या मुष्किलीनें जाऊ शकेल ती वाट त्यांनी अडविली आहे. ही बातमी कळताच मी हाजी अहमद बेग बख्शी, जव्हारचा जमीनदार विक्रम श्रीपत आणि इतर अधिकारी यांना स्वार, पायदळ, बर्कंदाज इत्यादींचें सैन्य बरोबर देऊन मराठ्यांचा मोड करण्यासाठी पाठविलें. तीन घटिका उभयदळाची लढाई झाली. काफरापैकीं कित्येक जण ठार अगर जखमी झाले. यानंतर शत्रूने पळ काढला. आमच्या सैनिकांनीं जिवापाड मेहनत केली. हाजी अहमद बेग बख्शी यानें आपल्या हातानें तीन माणसें ठार मारलीं. त्याला स्वतःला बाणाच्या दोन जखमा झाल्या. हाजी अहमदबेग बख्शी, हा शिपाई गडी आहे, आणि उत्साही आहे. या पूर्वीहि त्यानें पट्टा वगैरे किल्ले जिंकून घेण्याच्या मोहिमेंत कामगिरी बजावली होती. त्याला शंभर (जात) आणि पन्नास स्वार अशी बढती द्यावी असे मी त्र्यंबक किल्ल्याच्या प्रकरणात सुचविले होते. पण हुजुरांनी शंभर (जात) ने मन्सब वाढविली पण तिला बशर्ते खिदमत (नोकरीची अट) घातली. इतर अधिकाऱ्यांना ही अट न घालता बढत्या मिळाल्या आहेत तशीच बढती आपल्यालाही मिळेल अशी आशा तो बाळगून आहे. असे झाले तर या पुढेही तो श्रमसाहसाची कामे करील.

जुलूस बत्तीस रजब महिन्याच्या सतरा तारखेस (सत्तावीस एप्रील १६८९) मी कल्याणच्या परिसरात पोहोचलो. मी दुर्गाडीच्या किल्ल्याला वेढा घातला आहे. परमेश्वर कृपेने मी तो ताब्यात घेईन आणि इतर किल्लेही जिंकून घेईन. या जिल्ह्याचा समाधानकारक बंदोबस्त करीन.

मोहिमेसाठी लागणारी साधनसामुग्री पाठविण्याची आज्ञा व्हावी, ती लवकर आली तर मोहिमेत उपयोगी पडेल.

(९) मोगल माहुली घेतात, मातबर खानाची अर्जी १६८९. माहुलीचा किल्ला म्हणजे तळ कोंकणची राजधानीच. तिच्या (माहुली मराठ्यांच्या ताब्यात असतांना) भोवती मोगलांची ठाणी टिकून राहाणे अशक्य. किल्ल्यावर रसद, सरंजाम मुबलक. किल्ला अतिशय मजबूत. किल्ल्या भोवती वेढा घालून चौक्या बसविल्या तर त्यासाठी पाच सहा हजार पायदळ सहज लागेल. किल्ला जिंकून घेणे लांबणीवर पडेल. खर्चहि बराच येईल. म्हणून मी नरसू महाडीक याला मध्यस्थ नेमले. माहुलीचा हवालदार द्वारकोजी आणि किल्ल्यांतील इतर इसम यांनी बादशाहाची ताबेदारी पत्करण्यास मने वळविली. त्यांना बादशहाकडून मन्सबी, बक्षिसे आणि इतर कृपेच्या वस्तू देण्यात येतील अशी मी त्यांना आशा दाखविली आहे. बादशहाकडून हवालदारांना मन्सबीच्या सनदा मिळाल्या आणि किल्ला बादशाही अधिकाऱ्याच्या ताब्यात देण्याचें फर्मान आलें की माहुलीचा किल्लेदार आणि लगतचे महींद्रगड पळासगड आणि इतर किल्ल्याचे किल्लेदार शरण येतील, आणि किल्ले सुपुर्द करतील. माझी विनंति मान्य झाल्यास योग्य ते फर्मान, रोख रक्कम, घोडे इत्यादि सादर व्हावेत म्हणजे किल्लेदाराकडे त्या पोहोचत्या करता येतील आणि किल्ले आपल्या ताब्यात घेता येतील. बाला घाटावरील किल्ले जिंकून घेण्याच्या कामात मला फार खर्च आला. तीन वर्षापासून माझ्या जहागिरीत दुष्काळ पडला आहे. एक लाख रुपये सरकारात येणे राहिले आहे. माझी फार शोचनीय परिस्थिती आहे. आता कर्जही मिळत नाही म्हणून नादार म्हणून आपल्याला विनंति करीत आहे.

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

नाहीतर बादशाही सेवेत मी कधीच कसूर करीत नाही.

खर्डी हे गाव माहुलीपासून बारा कोसावर आणि कल्याणपासून अठरा कोसावर आहे. दौलतमंदखान (बागलाणचा राजा बहिर्जी याचा मुलगा) याने धर्मांतर केले. तो हा दौलतमंदखान खर्डीवर आहे. त्याला तेथे काम नाही. तो माझ्याकडे आला तर चौलच्या ठाणेदारीवर त्याची नेमणूक करता येईल.

मुर्तुजाखानाच्या तैनातीतील शंभर सैनिकांच्या बाबतीत आज्ञा झाली आहे की ते गुल्शनाबाद येथे आहेत. माझे पन्नास स्वार तेथे (गुल्शनाबाद) राहिले तर पुरे. अधिक स्वारांची तेथे आवश्यकता नाही. मुर्तजाखानाचे सैनिक माझ्यापाशी तैनात करण्यात यावेत. कोकणातील ठाण्यांच्या बंदोबस्तासाठी त्यांची आवश्यकता आहे.

(१०) औरंगजेबाचे फर्मान (१६८९).

माहुलीचा किल्लेदार आणि इतर यांना मन्सबी आणि बक्षिसे द्यावीत अशा अर्थाची अर्जी आमच्या नजरेखालून गेली. तुमची विनंति मान्य करण्यात येत आहे. तुमच्याकडे अडीच हजार अश्रफ्या पाठविण्यात येत आहेत. घोडे आणि वस्त्रे ही अतिवृष्टीमुळे पाठविणे शक्य होत नाही. किल्लेदारांच्यासाठी पाठविलेल्या वस्तू त्यांच्याकडे देऊन किल्ले लवकरच ताब्यात आणावे.

माहुलीच्या किल्ल्यावर किल्लेदारखान याची नेमणूक करण्यात आली असून तो लवकरच तेथे पोहोचेल. इतर किल्ल्यावरील नेमणुका किल्लेदारखान आपल्या लोकांतून करील.

मुर्तुजाखान हा दौलताबादेचा किल्लेदार आहे. त्याच्या माणसांना इतक्या लांब पाठविणे होणार नाही. तुमच्याकडे किल्ल्यातील जी माणसे तैनात झाली आहेत ती तुम्हाला येऊन मिळतील. दौलतमंदखान हा चौल बंदराच्या फौजदारी संबंधी उत्सुक नाही. अहमदखान किंवा इतर कोणी यांस पाठवावे. त्यांनी घाटाच्या पायथ्यावर आणि कल्याणवर देखरेख ठेवावी.

मुहंमदसफी (मुहसिनखानाचा जावई) हा चौक बंदरचा दारोगा आहे. तो शेवता घाटावरून एतिकादखानाकडे (झुल्फिकारखान) जात आहे. त्याला जहागीर देण्यात येईल. तुमच्या विनंतीप्रमाणे द्वारकोजीच्या नांवे (माहुलीचा किल्लेदार) फर्मान पाठविण्यात आले आहे.

(११) मातबरखानाची अर्जी (आगष्ट १६८९).

हुजुरांचे फर्मान हबीबुल्लाबेग गुर्जदार याच्याबरोबर पाठविलेले जुलूस तेहतीस शव्वालच्या वीस तारखेस (अठ्ठावीस जुलै १६८९) मिळाले. आपल्या आज्ञेप्रमाणे माहुलीचा हवालदार द्वारकोजी याच्याकडे आपले फर्मान आणि अडीच हजार अश्रफ्या पाठवीत आहे. किल्ला ताब्यात घेत आहे. नवीन किल्लेदार नेमून आला की किल्ला त्याच्या हवाली करीन. दौलतमंदखानाकडे कल्याणचा परिसर आणि घाट यांच्यावर देखरेख ठेवण्याचे काम देण्यात येईल.

माहूल्याजवळ जी पथके तैनात होणार होती ती अद्याप आली नाहीत. याबाबतीत बक्षींना आज्ञा करण्यात यावी. म्हणजे सजावल (अंमलबजावणीचे अधिकारी) पाठवून पथके आणि त्यांचे अधिकारी इकडे येतील अशी ते व्यवस्था करतील.

मला पूर्वी जहागीरी देण्यात आल्या होत्या. पण दुष्काळामुळे चाळीस हजाराने उत्पन्न कमी झाले. माहवार (महिन्याचा हिशेब) मध्ये तीस हजाराची तफावत आली. दोन्ही मिळून सत्तर हजाराचे नुकसान झाले. दरवर्षी नुकसान होत आहे. मी घोडदळाचा तिसरा भाग डाग देण्यासाठी (सरकारी घोड्यांना डाग देऊन खूण करीत) पाठवीत आहे. याशिवाय सरकारी कामासाठी मी आणखी पथके बाळगली आहेत. जहागीरखात्याचे दिवाण पै पैचा हिशेब करून पगार देतात आणि तोही बहुतेक बाबतीत तीन किंवा चार महिन्याच्या कराराने. यात माझेच फार नुकसान आहे. आपण आज्ञा केली की डाग दिलेल्या घोड्यांच्या संख्येप्रमाणे जहागिर दिली जाईल याबद्दल मी आभारी आहे. माझी विनंती की माझ्या नुकसानीच्या प्रमाणात मला सूट मिळावी. म्हणजे सहामाहीच्या प्रमाणे शिपायांच्या पगाराची व्यवस्था करता येईल.

सीरमतच्या परगण्यांत मला एक लाख वीस हजार दामची तनखा जहागीर आहे. त्याच परगण्यांत मुहंमद रशीद वाकेनिगार (आता त्याला कामावरून कमी केले) याल सात लाख दामची जहागीर, तो परगणा मला तनखा जहागीर म्हणून दिला तर मी त्या परगण्याची व्यवस्था चांगली करीन.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आवगडचा किल्लेदार श्यामसिंग हा आहे. त्याच्या ऐवजी आवगडवर दुसऱ्या कुणाची नेमणूक व्हावी. श्यामसिंगला माझ्यापाशी तैनात करण्यात यावे म्हणजे जिंकून घेतलेल्या किल्ल्यापैकी एकावर त्याची नेमणूक करता येईल.

रामसेजचा किल्ला गुल्शनाबादेपासून तीन कोसावर आहे. तेथील निम्मे पथक आणि किल्लेदाराचा मुलगा यांना माझ्यापाशी तैनात करण्यात यावे.

सय्यद मुर्तुजा विजापुरी यांची मुले, सय्यद सदर आणि सय्यद हुसेन हे आहेत. त्यांना प्रत्येकी ऐंशी स्वारांची मन्सब आहे. अहिवंतचा किल्ला त्यांच्याकडे आहे. इतकी कमी मन्सब असूनही त्यांनी तीस स्वार आणि शंभर पायदळ शिपाई बाळगले आहेत. ते धामधूम करीत आहेत. वाटमाऱ्या करू लागले आहेत. त्यांनी आणखी पथके बाळगण्यास सुरवात केली आहे. त्यांचे विचार बंडखोरीचे दिसतात. ही हकीकत वाकेनविसांच्या बातमीपत्रात नमूद आहे. कदाचित् आपल्या नजरेखालून गेली नसेल म्हणून अर्जीत नमूद करीत आहे. त्यांना त्या जिल्ह्यांतून बाहेर घालवून दिले तर तिकडील रहिवाशांना शांतता लाभेल.

(१२) मातबरखानाची अर्जी मोगल प्रबळगड घेतात यापूर्वी मी मुकुटगड, खतोरा, जामधरी, तिलंगगड, माणिकगड, सांक्षा, दुर्गाडी यांना वेढे घातल्याचे आणि प्रबळगड फत्ते होण्याची परिस्थिति असल्याचे कळविले होते. प्रबळगडचा किल्ला हा कोंकण प्रांतातील किल्ल्यांपैकी एक अतिशय बळकट असा किल्ला आहे. या भागातील पूर्वीचे अधिकारी या भागावर अधिकार चालवीत. आपल्या आज्ञेची वाट मी पाहिली असती तर हातची संधी गेली असती. म्हणून मी कोळी आणि भिल्ल यांचे नऊशे माणसांचे पायदळ तयार करविले. त्यात स्थानिक जमीनदारांचीहि माणसे होती. काका मन्सबदार, रघू आणि इतर सरकारी अधिकारी आणि माझे स्वतःचे अनुयायी यांना मी या पथकाच्या मदतीस पाठविले. या पथकांनी संधी साधून शव्वाल महिन्याच्या नऊ तारखेस (सतरा जुलै १६८९) मध्यरात्री किल्ल्यावर हल्ला चढविला. वारा जोराचा वाहात होता. आणि पाऊस मुसळधार पडत होता. तरीही माझी माणसे दोर लावून किल्ल्यावर चढली. शत्रू लढण्यास चालून आले. पहाट होईपर्यंत लढाई चालू होती. शत्रू पैकी कित्येक ठार आणि कित्येक जखमी झाले. काही जण किल्ल्यावरुन खाली पडून मेले. बाकीचे कैद झाले. आमच्या पैकी काहीजण कामी आले आणि काही जखमी झाले. परमेश्वर कृपेने किल्ला आमच्या ताब्यात आला.

शेख अब्दुस्सलाम हा प्रथम दोर लावून किल्ल्यावर चढला. त्यानें जिवाची शर्थ केली. त्याच्या बरोबर किल्ल्याच्या किल्ल्या आणि ज्यांना मन्सबी, बढत्या आणि बक्षिसे मिळण्यास हवीत त्यांच्या नावाच्या याद्या पाठवीत आहे. माझी विनंति मान्य होईल अशी आशा आहे. या किल्ल्यासाठी नवीन किल्लेदार आणि हशम (पायदळ शिबंदी) नेमण्यात यावी. कारण हा किल्ला मोठा आहे.

पूर्वी या किल्ल्यावर केसरसिंग हा बादशाही (मोगलातर्फे) किल्लेदार होता. नरकवासी शिवाजीच्या काळात या किल्ल्यावर पांच हजार पायदळाची शिबंदी होती.

सध्या आपल्याकडून किल्लेदार नेमून येईपर्यंत मी शेख मुहंमद इसहाक याला किल्ला सांभाळण्यास सांगितले आहे. त्याच्या बरोबर काही पथके दिली आहेत. आपल्याकडून लवकरच किल्लेदार नेमून आला की मी निश्चिंत होईन. वर दिलेले किल्ले ताब्यात घेऊन त्यांच्या किल्ल्या यापूर्वी पाठविल्या होत्या. आता हा प्रदेश हलकट शत्रूपासून मुक्त झाला आहे.

जव्हारचा जमीनदार विक्रम श्रीपत हा भिवंडीच्या ठाण्यावर आहे. आढळराव हा पनवेल आणि सांक्षा या ठाण्यावर आहे. हतोळीच्या ठाण्यावर अहमदखान आहे. कायसगाव आणि मुरबाड या ठाण्यावर गोविंदराव आहे. या महालांचा उत्तम बंदोबस्त राखण्यासाठी जे जे करणे आवश्यक आहे ते मी करीत आहे आणि करीन त्यात कसूर करणार नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, यांचे मासिक

वर्ष तेविसावे | अंक पहिला

नवभारत

ऑक्टोबर १९६९

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत)

संपादक-मंडळ

प्रा. वि. म. बेडेकर—प्रा. **गोवर्धन पारीख** का. संपादक

व्रत-पालन	ले. महात्मा गांधी	१–५
लो. टिळकांची पहिली समस्या **आधी सामाजिक की आधी राजकीय**	श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी	६–१२
वाङ्मयीन व तार्किक प्रक्रिया	प्रा. गो. ग. कुलकर्णी	१३–१७
तंजावर सरस्वती महाल– **‘ काही अज्ञात सारस्वत उपासक ’**	प्रा. मधुकर रामदास जोशी	१८–२७
मोगल मातबरखानाची अप्रकाशित पत्रे (१६८८–१७०५)	श्री. सेतु माधवराव पगडी	२८–३२
पाश्चिमात्यांचे साहित्यशास्त्र– **उषःकाल** (उत्तरार्ध)	डॉ. अ. ना. देशपांडे	३३–४०
स्वभाषेच्या सेवेतील एक उपेक्षित अंग	डॉ. र. चिं. ढवे	४१–४७
मार्क्सवाद आणि आधुनिक हिंदी-मराठी कादंबरी (१९२०–४७)	श्री. चंद्रकांत बांदिवडेकर	४८–५९
पुरावृत्त आणि इतिहास-संकेत	डॉ. सदाशिव अंबादास डांगे	६०–६७

वार्षिक रु. ९ | **सहामाही रु. ५** | **अंकास रु. १**

हे मासिक श्री. **म. शं. साठे** यांनी **दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई** येथे छापून प्रा. **वि. म. बेडेकर** यांनी प्राज्ञपाठशाळामंडळ वाई यांचेकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

पत्रव्यवहाराचा पत्ता : १ संपादकीय : कार्यकारी संपादक, ‘ नवभारत ’ मासिक,
‘ गणेश भुवन ’ २७६, तेलंग रोड, माटुंगा– मुंबई १९

२ व्यवस्थापकीय : व्यवस्थापक, ‘ नवभारत ’ मासिक,
C/o प्राज्ञ प्रेस, वाई (जि० सातारा)

३ चौकशी : श्री. बा. वि. कोनकर
१८८ एफ्, भीमरावबाडी, मुंबई २
फोन नं. ३५४८५४

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

श्री सेतुमाधवराव पगडी

मोगल मातबरखानाची अप्रकाशित पत्रे (१६८८-१७०५)

(१३) औरंगजेबाचे फर्मान

तुमची अर्जी मिळाली. तुमच्या मन्सबीत तीनशे स्वारांची बढती करण्यात येत आहे. आता तुमची मन्सब दोन हजार (जात), दोन हजार स्वार आणि पांचशे स्वार (दो अस्पा म्हणजे स्वारामागे दोन घोडे असल्याचे समजून) इतकी झाली आहे. तुम्ही माहुलीचा किल्ला जिंकून घेतला. इतर किल्लेही जिंकून घेण्यात तुम्ही कामगिरी बजाविली.

लच्छीराम यास निजामुल्मुल्की तळकोकणचा अमीन म्हणून नेमण्यात येत आहे. त्याच्याबरोबर तफंगची (बंदूकची), इतर पायदळशिपाई, आणि आवश्यक तो इतर सरंजाम देऊन त्याला रवाना केले आहे. त्याला हरप्रकारे मदत करावी. तीत कसूर करू नये. रयतेची आणि त्याची रुजवात करून द्यावी म्हणजे लच्छीराम हा सरकारी हुकुमानुसार महालांचा बंदोबस्त (महसूल, धारे इत्यादि) करील. तुमच्या अर्जीतील इतर मजकुराचे उत्तर लुत्फुल्लाखानाच्या पत्रावरून तुम्हाला कळेल. त्या प्रमाणे तुम्ही अंमलबजावणी करावी.

जेठमलकृत कल्याणची हकीकत

या ठिकाणी जेठमलने कल्याणच्या ठाण्याचा बंदोबस्त आणि कल्याण गांवात मातबरखानाने केलेल्या सुधारणा यांचा तपशील दिला आहे. तो म्हणतो–

एक वर्षाचा अवधीत मातबरखानाने या प्रदेशातील सगळे किल्ले जिंकून घेतले. त्यानंतर त्याने कल्याण गांवात मोठमोठ्या आकर्षक इमारती बांधल्या. त्याने बांधलेल्या वास्तूंचा तपशील असा–

(१) हवेली

ही हवेली मोठी आणि विस्तीर्ण आहे. हवेलीच्या मध्ये एक मनोरम आणि अजोड असा दिवाणखाना आहे. त्यांत बैठकीची (कामकाजासाठी) व्यवस्था आहे. याशिवाय हवेलीत अद्वितीय अशी दालने आहेत. हवेलीभोवती बाग, हौद, आणि कारंजी आहेत. मुहंमद अफजल मन्सबदार हे मातबरखानाच्या आप्तांपैकी असून ते एक उत्तमपैकी कवि आहेत. त्यांनी या वास्तूवर एक कविता लिहिली आहे. त्यातील कामिल आरामशाहदिलहा या अक्षरांच्या अंकावरून ही वास्तू बांधल्याचे अकराशेएक हिज्री (आक्टोबर १६८९ ते सप्टेंबर १६९०) हे वर्ष निघते.

(२) मशीद

मातबरखानाने याचवर्षी एक उत्तम अशी मशीद बांधली. मुहंमदअफजल यांनी तिच्यावरही एक कविता केली. अकराशेएक हिजरी (१६८९–१६९०) हे तिचे बांधणीचे वर्ष.

(३) हम्माम, स्नानगृह

स्नानगृहाची इमारत, आणि तिला लागून हौद इत्यादि यांची निर्मिति अकराशे तीन हिज्री (१६९१-९२) मधे झाली. हे स्नानगृह मातबरखानाच्या सराई-(धर्मशाळा)ला लागून बांधण्यात आले असे दिसते.

(४) बाग

ही बाग अकराशे चार हिज्रीत (१६९२-९३) तयार करण्यात आली. ही बाग शेणाळ्याच्या तलावाच्या काठावर होती. असे तिच्यावर रचलेल्या कवितेवरून दिसते, कवितेची शेवटची ओळ आहे " खुल्द-आमद किनारे शेणाळा, शेणाळ्याच्या काठावर स्वर्ग आला "

(५) स्वत:साठी वाडा

हा वाडा मोठा आकर्षक आहे. यात अनेक दालने आहेत. वाड्याभोवती अनेक ओटे (चबुत्रे), हौद, आणि कारंजीही आहेत. हा वाडा अकराशेदोन हिज्रीत (१६९०–९१) मधे बांधण्यात आला.

(६) कल्याणभोवती तटबंदी

अकराशे तीन हिज्रीत (१६९१–९२) मातबरखानाने कल्याण गावाभोवती तटबंदी उभारली.

(७) दिवाणखाना

मातबरखानाने दिवाणखान्याची इमारत अकराशे सात हिज्रीत (इ. स. १६९६) बांधून पूर्ण केली. सरकारी कामकाज प्रतिष्ठित पाहुण्यांचे आदरातिथ्य, मेजवान्या, विवाहादि कार्ये, सणासारखे उत्सव प्रसंग येथे करण्यात येत. या वास्तूवर मुहंमद अफजल

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

त्याने कविता केली. मातबरखानाच्या फौजेत तैनात असलेला धर्मशास्त्रज्ञ आणि न्यायखात्याचा सल्लागार शराफतपन्हा ख्वाजाकुतबुद्दीन मुहंमद मन्सबदार याने पण कविता म्हटल्या :

मीरमुहंमदसफी हा फौजेचा वाकेनवीस होता. तोही उत्तमपैकी कवि होता. त्यानेही दिवाणखान्याच्या इमारतीवर उत्कृष्ट कविता रचली.

मुहंमद अफजलने त्र्यंबक, माहुली इत्यादि किल्ल्याच्या विजयावर कविता केल्या आहेत.

फौजेचा दिवाण मुहंमदसईद याचा भाऊ अली जमान मन्सबदार याचे कवितेतील नांव ऐशी होते. त्याने मातबरखानावर एक दीर्घ स्तुतिकाव्य रचले आहे.

मातबरखानाच्या पत्नीचा मृत्यु

साराबीबीचा म्हणजे मातबरखानाच्या पत्नीचा मृत्यु अकराशे आठ हिज्रीत (१६९७–९८) झाला. तिला शेणाल्याच्या तलावाच्या काठावर दफन करण्यात आले. तिच्या थडग्यावर सुंदर मकबरा बांधण्यात आला. या इमारतीवर एक लाख रुपये खर्च आला. ही इमारत अकराशे सतरा हिज्रीत (इ. स. १७०६) पूर्ण करण्यात आली.

(१४) मातबरखानाची बादशहाला अर्जी

१६९३ सिद्धगड हा अतिशय बळकट असा किल्ला असून तो माहुलीपासून बारा कोसावर आहे. हलकट शत्रूंनी सिद्धगडला आपले मुख्य ठाणे बनविले होते. तेथून माहुलीच्या किल्ल्यावर हल्ला करावा असे त्यांचे बेत होते. मी लोमाणजी वगैरे मावळे पायदळाच्या लोकांना इनामे, व रोख बक्षिसे, आणि मन्सबी यांची आश्वासने दिली. याबाबतीत मुख्यप्रधान मदारुलमहाम असदखान यांचा शिक्का असलेला हुकूम आला होता. मी माझ्या शिक्क्याचा कौलनामा लोमाणजी वगैरेंना देऊन सहा महिन्यापासून सिद्धगड व इतर किल्ले जिंकून घेण्याचे वचन त्यांच्याकडून घेतले होते.

त्याप्रमाणे सदतीस जुलूस सफर महिन्याच्या एकोणतीस तारखेस (२० आक्टोबर १६९३) रात्रीच्या उत्तरार्धात लोमाणजी वगैरे मावळे दोर लावून किल्ल्यावर चढले. निकराची लढाई झाली. किल्लेदार जखमी होऊन कैद झाला. किल्ला आमच्या ताब्यात आला.

ही बातमी कळताच खांदजी (खंडोजी कदम) आणि दामाजी नारायण हे मराठे सरदार राजमाचीहून स्वार आणि पायदळ सैन्य घेऊन सिद्धगडच्या पायथ्यापाशी आले. किल्ल्यावर असलेले आमचे लोमाणजी आणि त्याचे सहकारी यांची परिस्थिती मोठी कठीण झाली.

ही बातमी लागताच मी काकाजी मन्सबदार आणि त्याच्या जमातीची माणसे, आमच्या सैन्यापैकी तीनशे स्वार आणि दीड हजार पायदळ यांना रावतमल झाला यांच्या बरोबर देऊन किल्ल्याकडे पाठविले, ते तातडीने किल्ल्याच्या पायथ्यापाशी पोहोचले. उभय दळात गोळीबार चालू झाला. किल्ल्याच्या माचीवर जागा फार लहान होती. म्हणून आमची वर असलेली माणसे किल्ल्याच्या खाली उतरून पायथ्याशी आली.

मध्यरात्रीच्या सुमारास काका मन्सबदार याने मोठे धाडस केले. त्याने सातशे निवडक असे सैनिक बरोबर घेतले; आणि अवघड वाटेवरून तो माचीवर पोहोचला. शत्रु त्याच्या समोर येऊन लढू लागले. सकाळपर्यंत मोठी निकराची लढाई झाली. शेवटी आमचा जय झाला. शत्रूपैकी अनेक ठार झाले. बाकीचे पळून गेले. आमच्या पैकी काही सैनिक आणि मन्सबदार कामी आले. आमचे सैन्य इतर किल्ले जिंकून घेण्याकडे वळले.

(१५) पोर्तुगिजांशी संबंध

पोर्तुगिजांनी काफरांबरोबर (मराठे) संगनमत केले. त्यांनी मराठ्यांच्या कबिल्यांना आपल्या इलाख्यात आश्रय दिला, आणि आमच्या किल्ल्यावर धाड घालण्याचा बेत केला. वाकेनविसांच्या बातमीपत्रावरून या गोष्टी आपल्यापर्यंत पोहोंचल्या असतीलच. मी पोर्तुगिजांना सांगितले की तुमचे हे वर्तन अयोग्य आहे. यामुळे बादशहाचा तुमच्यावर फार रोष होईल. पण माझ्या सांगण्याचा काही उपयोग झाला नाही. पोर्तुगिजांचा सरदार दमेल याने मराठा सरदार श्यामजी मोर देवनकर (?) याला त्याच्या दीड हजार सैन्यासह खांदेरीहून बोलावून घेऊन ठाण्यात आश्रय दिला; माहुलीवर मराठ्यांनी हल्ला करावा आणि त्यांत पोर्तुगिजांनी त्यांना मदत करावी असे ठरले. या प्रांताचा बंदोबस्त माहुली सुरक्षित राखण्यावर आहे. या संकटाचा वेळीच बंदोबस्त करावा म्हणून मी माझे स्वार आणि पायदळ यांचे पथक पोर्तुगिजांच्या इलाख्यात पाठविले. तळकोकणची रयत पोर्तुगिजांच्या इलाख्यात होती तिला आपल्या प्रांतात आणावी असा माझा उद्देश होता.

(येथे एक पान गहाळ झाले आहे)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

(१६) **उरणसंबंधी.** पोर्तुगीज आणि मराठे यांची आपसातील एकी आणि त्यांची धामधूम इत्यादींची हकीकत यापूर्वी हुजूरात निवेदन केली आहे. या सुमारास भोत्रा उरण बेटाचे काही जमीनदार माझ्याकडे आले. त्यांच्या बेटाला लागूनच समुद्राच्या तळाशी तीन ठिकाणी मोती आढळतात. ते काढण्याची व्यवस्था झाली तर आपल्याला हुरमुजी मोत्याहूनही चांगले असे मोती मुबलक मिळू शकतील. ही गोष्ट लोकांना कळू नये म्हणून पोर्तुगिजांनी त्या जागाभोवती चौकी पाहारे बसविले आहेत. ही पद्धत आदिलखान आणि निजामुलमुल्क (निजामशहा) यांच्या वेळेपासून चालत आली आहे. असे असूनही अंधाऱ्या रात्री संधी साधून काही माणसे त्या ठिकाणी बुडी मारून लहानलहान शिंपल्ये मोती काढून आणतात. गेल्या कित्येक वर्षांत तेथून मोती काढण्याचे काम न झाल्यामुळे तेथे मोत्यांचा अगणित साठा जमला आहे. आपण तिकडे आपली पथके पाठविली तर ती स्थळे सहज आपल्या ताब्यात येतील. तिकडील जमीनदारांनी मला ही हकीकत सांगितली. मी चौकशी केली तो जमीनदारांनी सांगितलेली हकीकत खरी निघाली.

म्हणून विनंति की मला तोफा, दारुगोळा, ही पुरविण्यात यावी. याकूतखान (जंजिऱ्याचा शिद्दी) याला समुद्राच्या मार्गे राजापुरीहून चार मोठ्या तोफा माझ्याकडे पाठविण्याची आज्ञा व्हावी. समुद्रातून मोती काढण्याच्या कामावर हुजुरांकडून एक प्रामाणिक अधिकारी नेमला जावा. परमेश्वर कृपेने मी अल्पावधीतच ते बेट जिंकून घेतो. मोती काढण्यात येऊन हुजुराकडे रवाना करण्यात येतील.

(१७) **सैनिकांच्या पगारांविषयी.** या प्रांताच्या व्यवस्थेसाठी मी शंभर स्वार आणि पाचशे बुंदेले बंदूकची प्यादे बाळगले आहेत. त्यांना कल्याणच्या ठाण्यातून निम्मा पगार मिळतो. त्यांच्या कुटुंबियांना उरलेला निम्मा पगार ताल व राळा या परगण्यातून देण्यात येतो. माझ्या विनंतीप्रमाणे हुजुरांनी तो महाल मला जहागीर म्हणून दिला. त्यामुळे वरील पथक त्या महालातून निम्मा पगार उचलून समाधानाने आपले काम बजावीत होते. सिद्धगड जिंकून घेतल्यानंतर (वीस आक्टोबर १६९३) मी इतर किल्ले आणि इलाखे जिंकून घेण्याच्या कामात गुंतलो होतो. तो आज्ञा झाली की महालाचा हिशेब पूर्ण झाल्यावर खोजा याकूत आणि जगतराय यांच्या रकमा त्या महालातून देण्यात याव्या. माझ्या पथकाचा पगार त्यामुळे कमी होतो. ते नाराज होऊन नोकरी सोडून देत आहेत तर विनंती ही की पूर्वीचाच हुकूम चालू रहावा. म्हणजे माझे शिपाई पूर्वीप्रमाणे पगार उचलून निःशंकपणे काम करतील आणि परागंदा होणार नाहीत. ही माणसे शिपाई बाण्याची आहेत. अशी माणसे या भागात मिळत नाहीत.

अंकीटंकीचा किल्लेदार सुहेलबेग आणि त्याचा मुलगा आणि काऱ्याचा किल्लेदार इनायतुल्ला हे हातोडा परगण्यातील माझ्या जहागिरीच्या आणि इतर खेड्याच्या रयतेवर जुलूम करतात. त्यानी खेडी उध्वस्त केली आहेत. या संबंधीचे महजर यापूर्वी हुजुराकडे रवाना झाले आहेत. पोहोचतील. सदर इसमांना तेथून बदलण्यात येईल अशी आशा आहे. म्हणजे प्रजेची त्यांच्या पीडेपासून मुक्तता होईल. अंकाईचा किल्ला प्रतापसिंग चौहान यांचा मुलगा दानेसिंग याला देण्यात यावा. मामलगंजचा किल्लेदार रघुनाथसिंग याला तेथून कमी करण्यात आले आहे. त्याची नेमणूक काऱ्याच्या किल्ल्यावर करण्यात यावी. या दोघा किल्लेदाराच्या मन्सबीत बढती करण्यात यावी. म्हणजे वरील किल्ल्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारे होईल. माझ्या जहागिरीही आबाद राहतील आणि कोकणातील माझ्या सैनिकांचा पगार चुकता करण्यास मला अडचण पडणार नाही.

(१८) **जव्हारच्या राजासंबंधी.** जव्हारचा जमीनदार श्रीपत हा पूर्वी बादशाही चाकरीत होता. तो गुलशनाबाद-(नाशिक) च्या ठाण्यात सरकारी कामगिरीवर असताना कामी आला. त्याचा मुलगा विक्रम हा चार वर्षांचा होता. श्रीपतची बायको गौराई हिने विक्रमचे संगोपन केले. तिने आपले कारभारी, नोकर चाकर, आणि कोळी जमातीचे प्रमुख यांचे समाधान केले. आणि ती स्वतःच्या जमीनदारीचे काम पाहू लागली. बादशहांनी कृपावंत होऊन विक्रमला मन्सब आणि श्रीपत ही पदवी दिली, विक्रम श्रीपतने ठाणे (गुल्शनाबाद) मजकुरात उत्तम कामगिरी बजाविली. त्याने जव्हार मधून शत्रूंना हाकलून लावले. आणि कोहिज आणि इतर पाच किल्ले शत्रूच्या ताब्यातून काढून घेऊन आमच्या इलाख्यात समाविष्ट केले.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

हुजुरांच्या हुकुमाने मी कोकणात उतरलो आणि ठाणी कायम केली. विक्रम श्रीपतला मी भिवंडीच्या ठाण्यावर नेमले. त्याने त्या ठाण्याचा मोठ्या खबरदारीने बंदोबस्त ठेवला.

विक्रम श्रीपत काही दिवसापूर्वी वारला. त्याला सात वर्षांचा एक मुलगा आहे. कोळयांची जमात जव्हारपासून जुन्नरपर्यंत पसरली आहे. गुल्शनाबादेहून (नाशिक) कल्याणला येणारी वाट कोळयांच्या खेड्यांतून जाते. विक्रम श्रीपतच्या मृत्यूने कोळी जमातीत खळबळ माजली,

(येथे एक पान गहाळ झाले आहे. पत्र १९)

सय्यद महंमद सादिक अल्काद्री याचा नातू आणि सय्यदशहाचा मुलगा कुतुबुद्दीन हा माहीमच्या मखदूम अलीच्या दर्ग्याचा व्यवस्थापक आहे. हा विद्वान धर्मशास्त्रज्ञ आणि साधुवृत्तीचा मनुष्य आहे. इस्लामाबाद (भिवंडी) आणि माहीम येथे अनेक साधूंच्या कबरी आहेत. त्यांची रोजची व्यवस्था, दर्ग्यांची आणि मशिदींची डागडुजी, वार्षिक उरुस इत्यादींचा खर्च कुतुबुद्दीनकडे लावून देण्यात आला आहे. समाधिस्थ फकीरांचे वारस आणि आप्तइष्ट अशी बायकामुले मिळून दोनएकशे माणसे आहेत. पूर्वी निजामुल्मुल्क (निजामशहा) आणि आदिलखान (आदिलशहा) यांच्या काळात कुतुबुद्दीनला वर्षासन, इनाम जमिनी इत्यादींच्या रूपाने बरेच उत्पन्न होते. पण नरकवासी शिवाजीच्या (सिवाए जहन्नमी) बंडाळीत सनदा नाहींशा झाल्या. अमीरु उमरा-(शायिस्ताखान ?) च्या अमदानीत कुतुबुद्दीनचा बाप सय्यदशहा याला शहाजादा मुहंमद मुअज्जमने कुंवार आणि इतर दोन खेडी सोनूल्याच्या मिराशीच्या मोबदल्यात इनाम म्हणून दिली, यानंतर शिवाजीने पुन्हा बंडाळी केली. सय्यद कुतुबुद्दीन हा विजापुरला गेला. विजापूरच्या अधिपतीने त्याला नळदुर्गकडे दोन खेडी इनाम म्हणून दिली. पुढे नळदुर्गचा महाल मोगलांच्या ताब्यात आला. कुतुबुद्दीनने त्या दोन खेड्यांच्या सनदा शहाजादा मुहंमदमुअज्जम, खानजहानबहादुर, आणि वरिष्ठ दिवाण यांच्याकडून संपादन केल्या. सुमारे वीस वर्षेपर्यंत त्याने या उत्पन्नाचा उपभोग घेतला. आणि समाधींच्या देखरेखीवर तो पैसा खर्च केला. यानंतर तो मक्केच्या यात्रेला गेला. तो गेल्यावर ती खेडी पण तनखा म्हणून इतर जहागिरदारांना लावून देण्यात आली. कुतुबुद्दीनवर अवलंबून असलेली माणसे उपासमारीत सापडली. या अर्थाचा महजर सगळया पुराव्यानिशी पाठविला आहे. तो हुजुरांना मिळेल.

आता परमेश्वरकृपेने कोकणचा प्रदेश बादशहांच्या ताब्यात आला आहे. कुतबुद्दीन ही मक्केची यात्रा आटोपून आला आहे. तो पूर्वीच्या वहिवाटीप्रमाणे दर्ग्यांची व्यवस्था करणे, तळकोकणच्या लोकांना शिक्षण (धार्मिक) देणे, आणि शिक्षक, आणि विद्वान यांना एकत्र आणणे या उद्योगात गढून गेला आहे. इस्लामाबाद (भिवंडी)मधे पूर्वीपासून धर्मशास्त्राचे शिक्षण देण्यात येत आहे. त्याचा परिणामही चांगला होत आहे. तर विनंति ही की सय्यद, कुतुबुद्दीनची मुले आणि आप्तेष्ट यांना इनाम आणि नळदुर्ग सरकारमधील खेड्यांच्या सनदा देण्यात याव्या. आणि दर्ग्यांचे उरुस, सदावर्त इत्यादिसाठी कुतुबुद्दीन येथील खजिन्यातून रकमा देण्याची व्यवस्था व्हावी.

(२०) स्वतःच्या कर्जाबद्दल. हुजुरांच्या हुकुमाने मी कोकणात उतरून एक वर्षाच्या वर होऊन गेले. त्यावेळी सरकारातून एकही बंदूकची माझ्या फौजेत तैनात करण्यात आला नव्हता. इकडील सरकारी कामाकडे लक्ष देऊन मी दोन हजाराचे पायदळ उभे केले. इकडील सर्व किल्ले मी आपल्या ताब्यात आणले. आजपर्यंत सरकारी सरंजाम मला मिळाला नाही. तरीही मी किल्ल्यांचा आणि प्रदेशाचा बंदोबस्त राखण्याचा प्रयत्न करीत आहे. नियमाहून अधिक प्यादे आणि स्वार मी बाळगले. त्यांचा महिन्या महिन्याचा खर्च भागविण्यासाठी मी माझ्याजवळ जे काही होते ते विकले आणि मिळू शकले तितके कर्ज काढले. स्वार आणि पायदळ याजवर खर्च अफाट झाला. माझ्या जहागिरीच्या महालाचे उत्पन्न एकचतुर्थांशही आले नाही. गेल्या दोन वर्षापासून ही परिस्थिति आहे. धान्याचे भाव घसरले आहेत आणि ते धान्यही विकत घेणारे मिळत नाहीत. मला अडीच लाख रुपयांचे कर्ज झाले आहे. यापुढे एक पैचेही कर्ज मिळणे अशक्य आहे.

(येथे दोन पाने गहाळ झाली आहेत)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

(२१) **कुण्या एका अधिकाऱ्याविषयी.** त्याचा काही अपराध नसताना त्याच्याकडून मोंगीरची जहागीर काढून घेण्यात आली. या गोष्टीला दोन वर्षे झाली. त्यामुळे त्याची अत्यंत दुर्दशा झाली. तो अतिशय कर्जबाजारी झाला. गेल्या वर्षी अज्ञातवासात निघून जाण्याचा त्याने विचार केला. मी त्याचे समाधान केले. त्या सावकाराकडून पांच हजाराचे कर्ज देवविले आणि काम चालू ठेवण्यास त्याचे मन वळविले. अद्यापपर्यंत त्याच्या जहागिरीचे महाल बहाल झाले नाहीत. त्याची अक्षरशः उपासमार झाली. कर्जदारांचे कर्ज आणि स्वतःचा वाढता खर्च यामुळे तो मेटाकुटीस आला. तो माझ्याकडे आला. त्याने आपल्या कमरेची समशेर काढून माझ्यासमोर ठेवली आणि म्हणाला की आता माझ्यात शक्ति राहिली नाही. कोठेतरी एकांतवास पत्करावा असे वाटू लागले आहे.

या काळात अनेक मराठे लबाडी करून आमची नोकरी सोडून पळून गेले. पण या अधिकाऱ्याने दुसरा कोणताच हेतु मनात आणला नाही. त्याचा पुतण्या याला तीनशे जात आणि शंभर स्वार अशा चारशेच्या मन्सबदारीचे आश्वासन देऊन ठाणे मजकुरावर नेमले आहे. वरील अधिकाऱ्याला हुजुराच्या सेवेत पाठविले आहे. आपल्या कृपेने त्याची जहागीर बहाल होईल अशी त्याला आशा आहे. आणि रंगो (अधिकाऱ्याचा पुतण्या) मजकूर याला माझ्या विनंतीप्रमाणे मन्सब मिळेल अशी आशा आहे. सदर अधिकाऱ्याला हुजुराकडून निरोपाची आज्ञा व्हावी. यावेळी मराठ्यांचे आक्रमण द्रुतगतीने माझ्या जवळ येत चालले आहे. अशा वेळी सदर इसमासारख्या अनुभवी आणि सचोटीच्या इसमाची आवश्यकता आहे. सांक्षा परगण्याचे काम सदर अधिकाऱ्याशिवाय इतर कोणी बादशाही अधिकारी करू शकेल असे वाटत नाही. त्याच्या परतण्यात उशीर झाला तर महाल मजकुराचा बंदोबस्त बिघडून जाईल.

(२२) रामनगर संबंधी

रामनगरचा जमीनदार नारायणदेव याला दीड हजार जात आणि सहाशे स्वार अशी मन्सब होती. तो माझ्या फौजेत तैनात होता. तो वारला. त्याचा मुलगा धर्मदेव हा चौदा वर्षांचा आहे. शंभर स्वार आणि पांचशेचे पायदळ घेऊन तो माझ्यापाशी येऊन तैनात झाला. याने बादशहाची ताबेदारी पत्करली आहे. त्याची रामनगरची जमीनदारी ही सुरत बंदरापासून जवळ आहे. तिकडील गुंडांचा बंदोबस्त, वाटांची राखण ही त्यांच्याकडे (रामनगरकरांकडे) आहेत. असीर, सत्या इत्यादि चार किल्लेही त्यांच्याकडे आहेत. हरदेवाच्या हाताखाली भिल्ल आणि कोळी यांची मोठी जमात आहे. नारायणदेव याच्या मृत्यूने त्याच्या जमातीत बेदिली झाली. आणि जमिनदारींत अंदाधुंदी सुरु झाली. हे पाहून मी धर्मदेवचे समाधान केले. त्याला पाठिंबा दिला. त्याची पथके परागंदा होऊ दिली नाहींत. त्याच्या इलाख्यांतील ठाणीं आणि किल्ले यांचा बंदोबस्त राखण्याचा तो एकच उपाय होता. नारायणदेव हा या भागांतील प्रमुख जमीनदार होता. तो बादशाहाचा ताबेदार होता. त्याचा मुलगा धर्मदेव याला त्याच्या बापाची मन्सब मिळावी. धर्म देवाचा भाऊ बसवंतसिंग हा बारा वर्षांचा आहे. त्याला त्याची पूर्वीची मन्सब बहाल ठेवावी.

धर्मदेवच्या जमीनदारीला लागून गुल्शनाबाद आणि वणी दिंडोरी हे परगणे आहेत. त्याच्या पथकाच्या सरंजामासाठी या परगण्यांतून त्याला जहागिरी देण्यात याव्या. म्हणजे त्याच्या फौजेचा सरंजाम कायम राहील आणि त्याच्या जमीनदारीत अंदाधुंदी माजणार नाहीं. नाहींतर जहागीरहि नाहीं आणि मन्सबहि नाहीं अशा स्थितीत बंडखोर कोळी मराठ्यांना जाऊन मिळायचे आणि आपल्या वर उल्लेखिलेल्या किल्ल्यावर धाड यावयाची.

नारायणदेव याला बऱ्याच दिवसांपासून जहागीर नव्हती. त्याला बरेच कर्ज होते.

असीर सत्या हा किल्ला फत्ते झाल्यावर हुजुरांनीं फर्मान काढून दहा हजार रुपये रोख आणि एक हत्ती बक्षीस देण्याचा हुकुम केला होता. अद्यापपर्यंत त्या वस्तू मिळाल्या नाहींत. फर्मान प्रमाणें रुपये आणि हत्ती धर्मदेवकडे पाठविण्यांत यावीं म्हणजे त्याला जहागीर मिळेपर्यंत त्याची खर्चाची कुचंबणूक होणार नाहीं. त्याच्या नांवे फर्मान आणि खिलतीचा पोशाक हीं रवाना करण्यात यावी म्हणजे तो आणि त्याची जमात ही मनःपूर्वक सरकारी कामगिरी पार पाडू शकतील.

— अपूर्ण

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, यांचे मासिक

वर्ष तेविसावे | अंक दुसरा

नवभारत

नोव्हेंबर १९६९

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत)

संपादक-मंडळ

प्रा. वि. म. बेडेकर—प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. मे. पुं. रेगे का. संपादक

लो. टिळककृत साम्राज्यशाहीची मीमांसा	श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी	१–९
गुरु नानक व त्यांचा धर्म	प्रा. न. र. फाटक	१०–१६
विज्ञान आणि तत्त्वज्ञान	लेखक मानवेंद्रनाथ रॉय : अनु. बा. रं. सुंठणकर	१७–२४
ब्राह्मणग्रंथातील पशुयज्ञ आणि अहिंसा	श्री. गणेश उमाकांत थिटे	२६–२८
हॅनोई स्मरणयात्रा	प्रा. मो. शा. शहाणे	३०–३७
अर्वाचीन मराठीतील शास्त्रीय वाङ्मय : (१८७० ते १९२०)	प्रा. डॉ. गार्गी सरदेसाई	३९–५५
मोगल मातबरखानाची अप्रकाशित पत्रे (१६८८–१७०५)	श्री. सेतु माधवराव पगडी	५७–६३
प्राच्यविद्यांचें अध्ययन व संशोधन : एक समालोचन	डॉ. प. ल. वैद्य	६५–७६
वाचकांचा-पत्रव्यवहार		७८–७९

वार्षिक रु. ९ सहामाही रु. ५ अंकास रु. १

हे मासिक श्री. म. शं. साठे यांनी दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई येथे छापून प्रा. वि. म. बेडेकर यांनी प्राज्ञपाठशाळामंडळ वाई यांचेकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

पत्रव्यवहाराचा पत्ता : १ संपादकीय : कार्यकारी संपादक, 'नवभारत' मासिक,

२ व्यवस्थापकीय : व्यवस्थापक, 'नवभारत' मासिक,

C/o प्राज्ञ प्रेस, वाई (जि० सातारा)

३ चौकशी : श्री. वा. वि. कोनकर

१८८ एफ्, भीमरावबाडी. मुंबई २

फोन नं. ३५४८५४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष

द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

श्री. सेतु माधवराव पगडी

मोगल मातबरखानाची अप्रकाशित पत्रे (१६८८-१७०५)

(२३) **मराठ्यांशी लढाया १६९५** या काळांत हणमंत (हणमंतराव निंबाळकर ?), शंकराराम (शंकराजीनारायण), केरू (केरोजी) व मल्हार वगैरे पंधरा मराठे सरदार हे दहाबारा हजार स्वारांचे सैन्य घेऊन निघाले आणि त्यांनी खानदेशच्या सुभ्याच्या दिशेने आक्रमण केले. त्यांनी तिकडील महालांत लुटालूट केली आणि लोकांचा छळ केला. माझ्या फौजदारी (फौजदार म्हणजे जिल्हाधिकारी) अंमलाच्या प्रदेशांत घुसण्याचा त्यांचा हेतु होता. मला ही बातमी लागली. माझ्या हाताखाली प्रदेश म्हणजे पुंड मराठ्यांचे आगर होय. ते लोक इकडील डोंगरदऱ्यांच्या आश्रयाने राहातात. आणि आमच्या किल्ल्यावर हे आघात करण्याच्या तयारीत असतात. पण देशाचे संरक्षण व्हावे आणि लोकांत शांतता नांदावी या हेतूने मी तेलंगराव, रावतमल झाला, आणि काका मन्सबदार यांना बरोबर पथके देऊन गुल्शनाबाद- (नाशिक) च्या ठाण्याकडे रवाना केले. तेथे पथक तैनात केल्याची हकीकत वाकेनविसांच्या बातमीपत्रांवरून कळलीच असेल. अडतीस जुलूस रजब महिन्याच्या बावीस तारखेस मी उल्लेखिलेले अधिकारी, गुल्शनाबादचा नायब ठाणेदार मुहंमदशफी आणि जवळपासचे ठाणेदार हे मराठ्यांचा मोड करण्यासाठी पुढे रवाना झाले होते. रजब महिन्याच्या चोवीस तारखेस (अठ्ठावीस फेब्रुवारी इ. स. सोळाशे पंचाण्णव) रघोजी हा हातोदा (पाटोदा) परगण्यांतून निघाला. त्याने मुहंमद सादिकला बरोबर घेतले. मोठे पत्रक घेऊन तो मनमाडला पोहोचला. तेथे तो आमच्या सैन्याला जाऊन मिळाला. रजबच्या सव्वीस तारखेस (दोन मार्च १६९५) बातमी आली की मराठ्यांनी बरीच लूट आणि गुरढोरेंही गोळा केली असून ते चांदवड आणि अंकीटंकीच्या किल्ल्याच्या पायथ्याशी असलेला कर्णाळा घाट ओलांडीत आहेत. माझे अधिकारी एकमताने त्यांच्यावर चालून गेले. त्याच रात्री मोठी हातघाईची लढाई झाली. उभयपक्षाचे अनेक लोक जखमी झाले. आमच्या सैन्याला शर्थ करावी लागली. शत्रूपैकी हणमंतराव (निंबाळकर ?) याचा भाचा मारला गेला. शेवटी शत्रू आमच्यासमोर टिकाव न धरून पळून गेले. त्यांनी धरून नेलेली गुरे ढोरे आमच्या हाती लागली आणि मालकांच्याकडे परत करण्यात आली. आमचे अधिकारी मालेगावजवळ दोनप्रहरपर्यंत तळ देऊन होते. रात्रीच्या शेवटच्या प्रहरी ते शत्रूच्या पाठलागावर निघाले. त्यांना मार देत देत त्यांनी शत्रूला गोदावरीच्या पलीकडे घालविले. पुन्हा एकदा त्यांनी गोदावरीच्या पलीकडे शत्रूची गाठ घेतली आणि कित्येकाना ठार मारले. शत्रूचे बरेच लोक जखमी झाले. बाकीचे दुर्जीच्या घाटावरून पळून गेले. आपल्याला मोठा जय मिळाला. या लढाईत ज्यांनी मर्दुमकी गाजविली त्यांची यादी वेगळी पाठविली आहे ती मिळेल.

गेल्या वर्षीही याच लोकांनी गुल्शनाबाद इलाख्यात काफरांशी लढताना अशीच मर्दुमकी गाजविली होती. त्यांच्यावर अद्याप हुजुरांची कृपा झाली नाही. त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे बक्षिसे मिळावीत. त्यांपैकी काहींना मी मन्सबीची आश्वासने दिली आहेत. त्यांना मन्सबी मिळाल्या म्हणजे त्यांचा माझ्यावर विश्वास राहील.

(२४) **अधिकाऱ्याची शिफारस १७००** हिलाल हा गेल्या अकरावर्षापासून माझ्या फौजेत तैनात आहे. तो शिपाईगडी असून कामाचा माणूस आहे. त्याने अनेक कामगिऱ्या पार पाडल्या आहेत. तो एकदाही सैन्यापासून अलग झाला नाही. त्याला मन्सब लहान. त्याचे कुटुंब मोठे. त्याची मोठी दुःस्थिति आहे. तो आता आपल्या सेवेत आला आहे. त्याला मन्सब वाटून मिळावी ही विनंति.

(२५) **विशाळगडच्या विजयाबद्दल अभिनंदन** १७०२ आपण सखरलना (खेळणा, विशाळगड) जिंकून घेतला हे ऐकून अतिशय आनंद झाला. मी परमेश्वराचे आभार मानले. आणि नगारे आणि शहाजणे वाज-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

विले. या विजयाबद्दल मी नम्रतापूर्वक पन्नास अश्रफ्या पाठवीत आहे. स्वीकाराची कृपा व्हावी.

(२६) **मुलगा अबुमुहंमद याजविषयी,** माझा मुलगा अबू मुहंमद हा चौदा वर्षाचा झाला आहे त्याचे शिक्षण झाले आहे. त्याला कुराण तोंडपाठ येते. तो आता अरबी शिकत आहे. त्याला मी हुजुरांच्या सेवेत पाठवीत आहे. त्याला मन्सब देण्यात यावी ही विनंति.

(२७) **भाच्यांविषयी विनंति.** माझे सख्खे भाचे शेख अहंमद आणि जैनुल आबिदीन हे तरुण आणि सुसंस्कृत आहेत. शेख अहमद याला शंभर जातची मन्सब आहे. जैनुल आबिदीन यास जी मन्सब आहे ती चारमाही आणि चतुर्थांशाची आहे. गेली नऊ वर्षे ते कोकण प्रदेशात मेहनतीने आणि मनःपूर्वक कामगिरी बजावीत आहेत पण त्यांचे कुटुंब मोठे आहे. मन्सब लहान व उत्पन्नही लहान त्यामुळे ते मोठ्या अडचणीत आहेत. मराठ्यांना ज्या पद्धतीने मन्सबी देण्यात येतात त्याच पद्धतीने यांना मन्सबी मिळतात. मला सहामाही मुकर आहे. त्याच हिशेबाने मला मासिक मुशाहिरा ठरला आहे. मरहूम मुल्ला अहंमद आणि त्याचा मोठा भाऊ शेख अब्दुल्ला त्यांना पांचमाही मुकर असून एक चतुर्थांशाची त्यांना माफी मिळाली आहे. शेख अहंमद आणि जैनुलाबिदीन यांना हुजुरात पाठवीत आहे. त्याना मन्सब वाढून मिळावी ही विनंति.

(२८) मुख्य प्रधान असदखान याला पत्र १६९८

गेल्यावर्षी धनाजी वगैरे मराठ्यांचे सरदार यानी वैजापूरला वेढा घातला होता. माझ्या अधिकाऱ्यांनी त्यांचा मोड केला. मराठे सरदारांच्या मनात या पराजयाबद्दल सूड उगविण्याचे होते. ही गोष्ट मी आपल्या कानावर घातली होती, आणि मला बालाघाटावर जाण्यास परवानगी मिळावी अशी विनंति केली होती. यावरून तुमच्या अधिकारांतील महालात तुम्हाला योग्य वाटेल त्याठिकाणी तुम्ही तळ देऊ शकता असे मला सांगण्यात आले. आज्ञेप्रमाणे मी कल्याणच्या ठाण्यावर माझ्यातर्फे एक नायब नेमला. मी स्वतः गुल्शनाबादेस (नाशिक) आलो. तेथे काही दिवस थांबलो. तेथे मी आपल्या पथकांची पुनर्रचना केली आणि नवीन स्वार आणि पायदळ उभे केले. मी येवल्याला येऊन तेथे छावणी केली. सैन्याच्या भोवती पहाऱ्याची आणि गस्त घालण्याची व्यवस्था केली. माझ्या अधिकाऱ्यांनी रोज दहाबारा कोसपर्यंत पुढे जाऊन गस्त घालावी अशी मी व्यवस्था केली. वाटेत शत्रू भेटले की त्यांचा मोड करावा. माझ्या या व्यवस्थेमुळे वैजापूर परगण्याच्या रयतेत शांतता नांदू लागली. शत्रूला माझ्या इलाख्यात प्रवेश करणे लाभाचे वाटले नाही. शंकराराम आणि त्याच्या बरोबरचे पंधरा मराठ सरदार मोठे सैन्य बरोबर घेऊन कन्नड, वेरुळ या परगण्यात आणि औरंगाबादच्या भोवती पसरले. त्यानी अनेक खेड्यातून गुरेढोरे लुटली. लोकांच्या येण्याजाण्याच्या वाटा त्यानी बद पाडल्या. व्यापार थांबला. लोकांना अतिशय त्रास होऊ लागला. मी काफरावर चालून जाऊन त्यांचा मोड करण्याचा ठाम निश्चय केला. शत्रू हरप्रकारच्या संधीची वाट पाहात होते. मी जर त्यांच्या दिशेने (कन्नड, वेरुळ) चालून गेलो तर ते माझा इलाखा रिकामा आहे असे पाहून शत्रू माझ्या जिल्ह्यावर चाल करून येतील अशी मला शंका होती. म्हणून मी आपला तळ हलविला नाही. मी आपले स्वार आणि पायदळ हे सर अफराजखानाच्या दिमतीचा मुहंमद सादिक आणि रघूजी या अधिकाऱ्यांच्या बरोबर देऊन बेचाळीस जुलूस रमजान महिन्याच्या अठरा तारखेस (वीस मार्च १६९८) त्यांना मराठ्यांच्याविरुद्ध पाठविले. आमचे सैन्य दोन मजला ओलांडून गेले तोच त्यांना कळले की मराठे कन्नडच्या परगण्यात आहेत. आमची फौज त्यांच्या पाठलागावर गेली. तेथून मराठे पळाले ते बुन्हाणुद्दीनच्या दर्ग्याकडे (खुल्दाबाद) पसरले. ते स्थळ लुटून घ्यावे असे त्यानी ठरविले. आमच्या सैन्याने सव्वाल महिन्याच्या तीन तारखेस (चार एप्रिल १६९८) पंचवीस कोसाची मजल मारली आणि ते मराठ्यांच्यावर तुटून पडले. मराठे टिकाव धरू शकले नाहीत. त्यानी पळ काढला. रोजा-(खुल्दाबाद)चे लोक त्यांच्या पीडेतून मुक्त झाले. कन्नड, खंडाळा, गंडापूर (गंगापूर), वेरूळ इत्यादि परगण्यातील गुरेढोरे धरून नेली होती ती सोडवून त्यांच्या मालकांकडे परत करण्यात आली.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

यानंतर मराठे फुलंब्रीकडे गेले. आमचे सैन्य आपल्या तळापासून लांब चालून गेले होते असे असूनही त्याने पायदळासाठी म्हणून अंमळ विश्रांति घेतली. यानंतर मराठ्यांचा पाठलाग करीत माझे सैन्य फुलंब्राला पोहोचले. मराठ्यांनी फुलंब्रीला वेढले होते. आणि तेथील गुरेढोरे धरली होती. तोच सव्वाल महिन्याच्या चार तारखेस (पाच एप्रिल १६९८)

(येथे एक पान गहाळ आहे)

ज्यांनी कामगिरी केली आहे त्यांची यादी पाठवीत आहे. त्यांना मन्सबीची बढती देण्यात येऊन त्यांच्यावर कृपा करण्यात यावी.

(२९) **गाजिउद्दीन फीरोज जंग सिपाहसालार यास** (१७०४) आपल्या पत्रात आपण पुढीलप्रमाणे कळविले आहे :

शिवा (शिवाजी) जाधव आणि इतर मराठे सरदार हे तीस हजारचे सैन्य घेऊन सुभे तेलंगण, हैद्राबाद आणि वऱ्हाड या प्रांतावर आक्रमण करून आले. त्यांनी चांद्याच्या राजाचा माणिकदुर्ग या किल्ल्यापाशी तळ दिला होता. आमचे सैन्य रात्रंदिवस मजला मारून पवनारच्या जवळ त्यांच्यावर तुटून पडले. त्यांच अनेक लोक ठार झाले त्यांनी धरून नेलेली अगणित अशी गुरेढोरे सोडविण्यात आली. मराठे मोठी दुर्दशा होऊन पळून गेले.

या बातमीने अतिशय आनंद झाला. आपल्या सैन्याच्या पराक्रमाने मराठे निष्प्रभ होऊन जातील याची खात्री होती. मराठे आपल्या सैन्यासमोरून पळ काढीत वऱ्हाडकडे आले. ते दुर्जीचा घाट उतरून खानदेशाकडे वळले. त्यांनी तिकडे लुटालूट सुरू केली.

रघू मन्सबदार हा पाचशे स्वार आणि दोन हजार प्यादे, बर्कंदाज आणि तीरंदाज यांची पथके घेऊन पाटोद्याच्या परगण्यावर आहे. मराठे या भागात येत असल्याची बातमी मला कळताच मी रघूला कळविले की त्यांचा प्रतिकार करावा. त्याप्रमाणे त्याने मराठ्यांच्यावर हल्ला केला. तीन प्रहर पर्यंत हातघाईची लढाई झाली. रघूने मराठ्यांना हटविले. अनेकांना मारून अगर जखमी करून त्याने मराठ्यांना गोदावरीच्या पलीकडे घालविले. हे सर्व आपल्या कृपेचे फळ होय. आता आपण त्या प्रांतात वास्तव्य करून आहात. आता मराठ्यांना डोके वर काढण्याची काय हिंमत होणार.

(३०) **गाजिउद्दीन फीरोजजंग यास.** आपण चौंदचा किल्ला जिंकून घेतला असे कळले. ही बातमी ऐकून अतिशय आनंद झाला. आपल्याला प्रतिदिन असेच विजय मिळत जावोत.

(३१) **चीनकिलीच खान (भावी निजामुल्मुल्क) याला पत्र–** आपले पत्र मिळाले. त्यांतील मजकूर असा " मराठयांचा सरदार धनाजी जाधव याने कल्याण आणि गुल्शनाबाद या प्रांताकडे आक्रमण करून जाण्याचा बेत केला. आमच्या फौजने त्याला मार देत कुंबारच्या (कोरीगड) किल्ल्याजवळ नेऊन घातले. धनाजीने कुंबारी (कोरी) किल्ल्याचा आश्रय घेतला असून तो कल्याणभिवंडीकडे येण्याचा विचार करीत आहे. आमच्या फौजाहि नूर घाटावर (भोर) पोहोंचल्या. शत्रू घाटावरून खाली उतरला तो तुमच्या जिल्ह्यांत पसरेल- तुम्ही आपली फौज तयार ठेवावी. आमची फौजहि लवकरच तिकडे येईल."

आपल्या या पत्राने आम्हाला मोठे बळ प्राप्त झाले. दैव आमच्या फौजेची साथ करीत आहे. शत्रू दुर्दशेला पोहोंचल्याशिवाय राहाणार नाही. तुमच्यासारख्या बनराजाशी मुकाबला करण्याची त्या कोल्ह्याची हिंमत काय ? मी तयार आहे. आपल्या ठाण्यांचा बंदोबस्त करून सावधगिरीने वागत आहे. शत्रू इकडे आले तर तिकडून आपण आणि इकडून मी अशा उभयतांच्या मध्ये त्यांना कोंडून त्यांचा नक्षा उतरवू. एकालाहि जिवंत जाऊ देणार नाहीं.

(३२) **मुख्य बक्षी (जुल्फिकारखान ?) यास–** मराठयांनी सर्वत्र बंडाळी सुरू केली आहे. कल्याण येथे आपली फौज थोडी आहे. सरंजामही थोडा आहे. मला बरेच कर्ज झाले आहे. धान्याचे भाव घसरले आहेत, धान्याला गिऱ्हाईक नाही. त्यामुळे गेली तीन वर्षे माझ्या जहागिरीच्या महालांतून एकतृतीयांश उत्पन्नहि झाले नाही. दोन वर्षापासून मी एक हजार स्वार बाळगले. हे स्वार शिबंदीच्या मोबदल्यात होते. त्यांचा ठरलेला जहागीर सरंजाम मला मिळाला नाही. सरकारांतून मला तीस हजाराचे देणे आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

त्र्यंबकच्या वेढ्याच्या वेळी मरहूम फाजलखान यांच्या मोहोरेनिशी मला जे आज्ञापत्र आले त्यांत मला आश्वासन देण्यात आले होते की त्र्यंबक जिंकून घेण्यात जो काही खर्च येईल तो सरकारी खजिन्यांतून दिला जाईल. त्या भरवंशावर मी सावकारांकडून एक लाख वीस हजार रुपयांचें कर्ज काढले आणि त्र्यंबकचा किल्ला जिंकून घेतला. त्यानंतर मला तीस हजार रुपये रोख बक्षीस म्हणून देण्यात यावे असा हुकूम झाला. पण अद्यापपर्यंत ती रक्कम मला मिळाली नाही. माझे सावकार कर्जाचा तगादा करीत आहेत.

केवळ सरकारच्या मोहिमा पार पडाव्या म्हणून कोंकणात उतरल्यापासून मी नेमलेल्या पथकाहून अधिक असे पांचशे स्वार आणि तीन हजाराचे पायदळ बाळगले. आणि माझ्या फौजदारीत (अधिकारात) असलेल्या ठाण्यांचा उत्तम बंदोबस्त ठेवला. मी कर्जबाजारी झालो आहे. माझी परिस्थिति चांगली नाही.

या सुमारास पट्ट्याचा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात गेला. मराठ्यांचे आक्रमण, प्रत्येक जिल्ह्यांत सुरू झाले. चहूकडून त्यांच्या धामधुमीच्या बातम्या येऊ लागल्या. यावेळी आमच्या ठाण्यांतून योग्य ते पथक आणि सरंजाम ही असली तर अडचणीच्या प्रसंगी उपयोगी पडतील. माझ्या हाताखाली बालाघाट आणि घाटाखालची ठाणीं आहेत. स्वार आणि प्यादे यांच्यात भर घालून ठाण्यांतून मी ठेवू शकेन. म्हणजे सगळ्या ठाण्यांचा बंदोबस्त खबरदारीने करता येईल.

यापूर्वी मी राउतराव ओकला मन्सबदार आणि रुस्तमबेग जमादार यांना सिन्नरच्या ठाण्याचे रक्षण करण्यासाठी पाठविले होते. मराठे सरदार बरेच सैन्य घेऊन तबलगांव येथे पोहोंचले. आणि तेथील रयतेला त्यांनी पीडा देण्यास सुरवात केली. राउतराव आणि रुस्तमबेग हे सफर महिन्याच्या तेवीस तारखेस आपल्या ठाण्यांतून निघून मराठ्यांच्यावर चालून गेले. झालेल्या लढाईत त्यांना प्रत्येक तलवार आणि भाले यांच्या पांच पांच जखमा होऊन ते कामी आले. त्यांची मुले मोठी असून ठाणें मजकुरांत सरकारी कामावर आहेत. सरकारची त्यांच्यावर कृपा व्हावी. सोबत यादी पाठविली आहे ती प्रमाणे त्यांच्या मन्सबीत वाढ व्हावी. आणि मयतांच्या जहागिरी त्यांच्या मुलांच्या नांवे कायम करण्यांत याव्या. म्हणजे त्यांचा उत्साह वाढेल आणि त्यांची पथके परागंदा होणार नाहीत.

किल्ले पट्टा परत जिंकून घेणे आवश्यक आहे. नाहीतर मराठ्यांची धामधूम थांबविणे आणि ठाणी सुरक्षित राखणे कठीण जाईल. विनंति की हुजुरांतून एखादा सरदार उत्तम सैन्य देऊन पाठवावा. हा किल्ला जिंकण्याचा कामावर त्याला नेमावा म्हणजे तो तडक येऊन किल्ल्याला वेढा घालील.

किंवा आवश्यक तो सरंजाम आणि सैन्य ही मला देण्यात यावी म्हणजे मी घाटावरची आणि घाटाखालची ठाणी यांचा बंदोबस्त राखून किल्ला (पट्टा) जिंकून घेण्यास झटेन.

त्र्यंबकचा किल्लेदार कदीमकुलीखान वारला. त्याचा मुलगा लहान आहे. तो कर्जबाजारी आहे. सावकाराचा तगादा चालू आहे. त्याची परिस्थिति शोचनीय आहे, त्र्यंबकचा किल्ला त्याच्याने सांभाळणे शक्य नाही. हुजुरातून कोणी तरी उमदा आणि अनुभवी मनुष्य किल्लेदार म्हणून पाठवावा. नाहीतर त्या किल्ल्यावर भयंकर संकट कोसळेल (किल्ला आपल्या ताब्यातून गेला) तर त्याचा परिहार करणे कठीण होईल.

(३३) **मिर्जायार अलीबेग यास–** आपले पत्र मिळाले, त्यांत बादशहाचा हुकूम की तुम्ही शत्रूच्या सरदाराचा वेळीच मोड का केला नाही. कामे बिघडवून टाकता. त्याबद्दल विनंति की काफराच्या विरुद्ध जिहाद करण्यात माझ्याकडून मुळीच कसूर झाली नाही आणि होणार नाही. ज्या ज्या वेळी मराठे इकडच्या भागात आले त्या त्या वेळी त्यांचा मोड करण्यात आला आहे. माझ्या इलाख्यात ते टिकू शकत नाहीत. बरेच मराठे आपल्या चाकरीत येत आहेत व येतील.

कांही दिवसापूर्वी मराठ्यांच्या किल्ल्यांना भोवतालच्या प्रदेशातून रसद आणि कुमक मिळाली त्यामुळे ते किल्ले जिंकून घेणे जमले नाही. या सुमारास मी फिरंग्याशी तह केला. अट ही की त्यांनी (पोर्तुगिजानी) मराठ्याना आपले कट्टर शत्रू समजावे आणि आपल्या स्वतःच्या इलाख्यातून मराठ्यांच्या किल्ल्याना रसद जाऊ देऊ नये. परमेश्वर कृपेने मराठ्याचे किल्ले फत्ते होतील इतकी मेहनत करूनही बादशहानी म्हणावे की मोहिमेत मी

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मन घालीत नाही आणि कामे नासतात तर हे माझे दुर्दैवच म्हटले पाहिजे.

(३४) **सदरुस्सुदूर (न्यायाधीश) सियादतखान** यास, आपले पत्र मिळाले. त्यांत म्हटले आहे की एतिमादखानाच्या पत्रावरून तुमच्या लोकानी पोर्तुगिजांची खेडी लुटली असे कळल्यावरून बादशहाची गैर मर्जी झाली आहे. फिरंगी हे बादशहाची आज्ञा मानतात आणि दर वर्षी व्यापारानिमित्त सुरतेला माल पाठवीत असतात. बादशहानी आज्ञा केली आहे की पोर्तुगिजांच्या खेड्यात जो माल लुटला आहे तो त्याच्या मालकाकडे परत करावा. माल परत मिळाल्याचा राजीनामा पोर्तुगिजाकडून घेऊन मीर सालेह गुर्जबर्दार याच्याबरोबर पाठवून द्यावा. आणि यापुढे पोर्तुगिजाशी भांडू नये. मी याचे उत्तर मुख्य बक्षींच्याकडे पाठविले आहे. आपल्याशिवाय माझ्यावर मेहरबान असा कोण आहे म्हणून मी वस्तुस्थिति आपल्यासमोर मांडीत आहे. फिरंग्यानी (पोर्तुगीज) मराठ्याशी संगनमत केले. मराठ्यांच्या कबिल्याना त्यानी आपल्या इलाख्यात आश्रय दिला. ही हकीकत यापूर्वी मी हुजुरात कळविली होती.

आमच्या प्रदेशातील रयत पोर्तुगिजांच्या इलाख्यात जाऊन राहिली होती. त्यानी परत आमच्या इलाख्यात येऊन वसावे अशी पोर्तुगिजांची इच्छा नव्हती. त्यामुळे आमचे सैन्य त्यांच्या इलाख्यात पाठविण्यात आले. पोर्तुगिजाना चांगलाच तंबी देण्यात आली. आमच्या सैन्याने त्यांची देवळे जाळली, आमची रयत, रयतेची बायकामुले, गुरेढोरे याना आम्ही परत घेऊन आलो आणि त्यांना जमीनदारांच्या हवाली केले. अशा रीतीने आमच्या रयतेला आमच्या इलाख्यात पुन्हा वसविण्यात आले.

आता हुजुरांची आज्ञा झाली आहे. तीस अनुसरून पोर्तुगिजावरचे आक्रमण परत घेण्यात आले आहे. पोर्तुगिजाशी तह करताना पुढील मंडळी साक्षीदार होती. खान फोरोजजंगाच्या फौजेत तैनात असलेला हाजी मुहंमदबेग मन्सबदार, सिद्दी खैरियतखान याचा वकील काजी इब्राहीम, एतिमादखानाचे प्रतिनिधि बालूलखान आणि इनायतबेग. तहाच्या अटी अशा की पोर्तुगिजांनी यापुढे मराठ्यांशी एकी करू नये. तीन फिरंगी कैदी, इतर कैदी आणि गुरेढोरे यांना पोर्तुगिजांकडे परत करण्यात आले. पोर्तुगिजांच्या कडून राजिनामा घेऊन तो गुर्जबर्दाराबरोबर पाठविला आहे. इस्लामच्या आज्ञांचा प्रचार आणि लोकांना वसविण्याचे कामही मी मनःपूर्वक करीत आहे. या उध्वस्त इलाख्यात मी दीडशे खेडी पुन्हा आबाद केली. इतकी मेहनत करूनही माझ्या मन्सबीत घट करण्यात आली आहे. आणि माझ्यावर रोष झाला आहे. हे माझे दुर्दैव होय. आपण योग्य वेळ पाहून हुजुरांच्या कानावर ही गोष्ट घालावी आणि माझ्या मन्सबीत जी घट करण्यात आली आहे ती परत बहाल करावी.

(३५) **सुरतेचा अधिकारी एतिमादखान यास**– आपण शेजारी आहोत. या भागात आपले काही काम असल्यास मला निस्संकोचपणे सांगावे. काजी इब्राहीम आणि आपण पाठविलेले इनायतबेग यांच्या संमतीने पोर्तुगिजाशी तह झाला. त्यांचे कैदी आणि गुरेढोरे ही परत करण्यात आली. त्यांच्या व्यापाऱ्यांची सुरतेला ये जा सुरू झाली. दर्याची वाट पूर्वीप्रमाणे मोकळी झाली. हे आपल्याला पूर्वी कळविले आहे. इनायतबेग यांनीही आपल्याला सांगितले असेलच. आपण हुजुरात लिहाल तर मी काय केले या संबंधी आपण दोन ओळी लिहाव्यात. सलाबतखानाच्या नावे लिहिलेले वरील अर्थाचे पत्र माझ्याकडे पाठवावे म्हणजे येथून दरबारातील माझ्या वकीलाकडे पाठवीन.

(३६) **याकूतखान यास पत्र**– मराठ्यांनी राजमाचीच्या किल्ल्यात आपला तळ दिला आहे. तेथून ते कर्नाळयाच्या शिबंदीला मदत करीत असतात. किल्ल्याच्या भोवती आमची खेडी (बादशाही इलाख्यातील) आहेत तीत ते मधून मधून धामधूम करीत असतात. यामुळे त्या भागात मोठी अशांतता होत असते. मी निश्चय केला आहे की कर्नाळयाच्या किल्ल्याला वेढा घालून तो आपल्या ताब्यात आणावा, आणि लोकांना पीडा देणारा काटा काढून टाकावा. कर्नाळा किल्ल्यावर पुरेशी रसद नाही, असे समजले आहे. हीच वेळ किल्ला जिंकून घेण्याची आहे. मी कर्नाळयाच्या पायथ्यापाशी सैन्य पाठविले आहे. जवळपासची भाताची आणि इतर धान्याची पिके उध्वस्त

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

करावी अशी सैन्याला सूचना देण्यात आली आहे. म्हणजे किल्ल्यातील लोकांना रसद मिळू शकणार नाही. तुमच्यात आणि माझ्यात पूर्वीपासून मैत्री आणि एकमत आहे. हे काम सरकारचे आहे. आपण आपल्याकडून कर्नाळ्याकडे येणाऱ्या दर्यांच्या वाटा रोखून धराव्या. म्हणजे खांदेरी आणि कुलाबा येथून कर्नाळ्याला मदत पोहोचू शकणार नाही. आम्ही इकडून खुश्कीच्या मार्गाने त्यांच्यावर हल्ला करू. म्हणजे किल्ला फत्ते होईल.

(३७) **याकूतखान यास पत्र** पोर्तुगिजांनी मराठ्यांशी संगनमत केले आहे त्यांनी मराठ्यांच्या कबिल्यांना आपल्या प्रदेशात आश्रय दिला आहे. मराठे बादशाही इलाख्यावर हल्ले करतात आणि लुटीचा माल निम्मा स्वतः घेतात (निम्मा पोर्तुगिजांना). यामुळे आमच्या या प्रदेशात भयंकर अंदाधुंदी माजली आहे आणि इलाख्याचा खरा बंदोबस्त होत नाही. पोर्तुगीज इलाख्याच्या आश्रयामुळे मराठ्यांच्या जमातीला बळ आले असून ते दिवसेंदिवस वाढत आहे. मी पोर्तुगिजांना समजविले की ही वागणूक बरी नाही. तुमच्यावर बादशहाचा कोप होईल. तुम्ही मराठ्यांना आपल्या प्रदेशात आश्रय देऊ नका. पण त्यांनी माझे म्हणणे ऐकले नाही. मी काही काळ हे सहन केले.

या सुमारास श्यामजी मोरोपंत हा खांदेरीच्या किल्ल्याहून निघून पोर्तुगिजाकडे आला. पोर्तुगिज आणि मराठे हे एकमत झाले असून भिवंडीवर हल्ला करून ते उध्वस्त करून टाकण्याचा त्यांचा बेत ठरला आहे. या लोकांना चांगली अद्दल घडविल्याशिवाय ते ताळ्यावर येणार नाहीत असा मी विचार केला. तुमची आणि आमची मैत्री आहे. माझा विचार असा आहे की या महिन्याच्या सतरा किंवा एकोणीस तारखेस (पोर्तुगीज इलाख्यावर) स्वारी करावी. मराठ्यांचे कबिले फिरंग्याच्या प्रदेशात आहेत. या आश्रयामुळे मराठ्यांना जोर चढला आहे. त्यांना (कबिले), पकडून कैद करावे. या कामात त्यांनी (मराठे व पोर्तुगीज) यांनी प्रतिकार केला तर त्यांना मारून काढावे. तुम्ही पण साष्टीच्या बाजूने स्वारी करावी. आणि फिरंग्यांना शिक्षा करावी म्हणजे ते यापुढे मराठ्यांना आश्रय देणार नाहीत. आपण ही गोष्ट कराल अशी खात्री आहे. मसलत घडून येईपर्यंत ती गुप्त ठेवण्याची आपल्या अधिकाऱ्यांना सूचना देऊन ठेवावी.

(३८) **याकूतखान यास–** एतिमादखान यांनी आपल्याला पत्र लिहिले ते पाहाण्यात आले. नूरमुहंमदाच्या हाती आपण पत्र पाठविले ते मिळाले. माझ्यापाशी जे सैन्य आहे. ते मराठ्यांचे किल्ले जिंकून घेण्यासाठी आहे. सिद्धगड जिंकून घेण्यात आला आहे. इतर किल्ले जिंकण्याची मसलत चालली आहे. अशावेळी फिरंग्याशी बिघाड होणे नको. त्यांनी बादशहाचा हुकूम आणून तह केला आहे. त्यांचे अपराध माफ करावे म्हणून बादशहाची आज्ञा झाली आहे. आता त्यांच्यात आणि माझ्यात काही तक्रार राहिली नाही. आपणही माझ्याकडून पोर्तुगिजांची खातरजमा करावी. काजी इब्राहीमच्या हस्ते यापूर्वी आपल्याला लिहिण्यात आले आहे. साष्टीचे फिरंगी अधिकारी यानाही आपण लिहावे. मी पण त्याना खातरजमेचे पत्र लिहीत आहे.

(३९) **सुरतेचा अधिकारी एतिमादखान यास १६९३ –** आपले पत्र मिळाले. पोतुगिजाबरोबर ज्या कटकटी झाल्या त्याची हकीकत मोठी आहे. त्याचा सारांश असा :

मी कोकणात उतरून चार वर्षे झाली. मराठ्यांच्या उपद्रवामुळे तळकोकणची रयत जव्हार, रामनगर इत्यादि भागात निघून गेली होती. पहिल्यावर्षी मी रयतेचे समाधान करून तिला परत आणली आणि अशा रीतीने सहाशे खेडी पुन्हा आबाद केली. दुसऱ्या वर्षी (इ. स. १६९१) पोर्तुगिजांनी मराठ्यांच्या कबिल्यांना आपल्या इलाख्यात आश्रय दिला. पोर्तुगीज आणि मराठे एक झाले आणि त्यानी बकसतगड (वतनगड) वर मोठा आघात केला. आमच्या खेड्यातील शेतकरी पोर्तुगीज इलाख्यात जाऊन राहिले, त्यामुळे कल्याणचे ठाणे सुदृढ राहण्याचे चिन्ह दिसेना. तिसऱ्या वर्षी (१६९१–९२ त्यानी कर्नाळ्याच्या किल्ल्यावर मोठा आघात केला (किल्ला घेतला). किल्ल्याच्या शिबंदीला ते रसदेचा सारखा पुरवठा करीत. मराठ्यांच्या या धामधुमीमुळे रयत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

फिरंग्यांच्या (पोर्तुगिजांच्या) मुलुखात जाऊन राहिली. मी पोर्तुगिजांना पुष्कळ समजाविले पण काही उपयोग झाला नाही. मराठ्यांनी पट्टा किल्ला घेतला. पोर्तुगीज आणि मराठे एक झाले. साष्टीचा पोर्तुगीज सुभेदार किस्पनदामेलो याने श्यामजी मोर देवकर या मराठा सरदाराला मोठ्या सैन्यानिशी खांदेरीहून बोलाविले आणि त्याला ठाणे गावात आश्रय दिला. त्यांनी ठरविले की एक होऊन माहुलीच्या किल्ल्यावर आणि भिवंडी गावावर हल्ला करावा. कोकणातील ठाण्यांची स्थिरता माहुली किल्ल्यावर अवलंबून आहे. म्हणून या संकटाचा वेळीच इलाज करावा म्हणून मी पोर्तुगीज हद्दीत सैन्य पाठविले. त्यांच्या हद्दीत गेलेली आमची रयत परत आणावी आणि मराठे सरदारांचे कबीले आढळले तर त्यांना कैद करून आणावे. ही कामे सैन्याला सांगण्यात आली होती. पोर्तुगीज आणि मराठे एक होऊन आमच्याशी लढू लागले. कल्याणचे ठाणे शांत आणि आबाद राहावे अशी त्यांची इच्छा नव्हती. नाहीतर मला पोर्तुगिजांशी भांडण्याचे काय कारण होते.

याकूतखानाने मला पत्र लिहिले आहे. त्यात ते म्हणतात, दोन वर्षे झाली. बादशहाकडे चार घोडे पाठवावयाचे होते. साष्टीच्या पोर्तुगीज सुभेदाराने ते अडकवून ठेवले. आहेत. ते सोडून द्या म्हणून लिहिले तरी त्याचा उपयोग होत नाही. बादशहासाठी पाठविलेले घोडे पोर्तुगीज अडकवून ठेवतात यावरून पोर्तुगिजाना किती गर्व चढला आहे याची कल्पना येईल. बादशहासाठी पाठविलेल्या घोड्याबद्दल ही वागणूक तर इतरांची काय कथा. योग्य सल्लामसलतीने याचे उट्टे काढता येईल.

(४०) **खैरियतखान यास**, आपले पत्र मिळाले. आपण लिहिता की "पोर्तुगिजांनी माल, घोडे आणि जहाज ही परत केली तर त्याहून अधिक काय हवे." साष्टीहून काही माणसे येथे आली आहेत. त्यांच्याकडून कळले की पोर्तुगिजांनी आपला नोकर सय्यद अबू याजकडे आपले जहाज परत केले आहे. ते आपल्याला मिळाले असेल. काय ते कळवावे, मिळाले असल्यास उत्तम, नाहीतर लवकरच पोर्तुगिजांना शिक्षा करता येईल.

(४१) **याकूतखान यास**- आपले पत्र मिळाले. आपण लिहिता की आपण दर्यापार होऊन राजकोट (चौल) वर हल्ला चढविला. आपल्या सैन्याने शौर्य गाजविले. शत्रूपैकी अनेक ठार झाली आणि अनेक कैद झाली. आणि किल्ल्यातील लोक हवालदील झाले आहेत. आपल्या पत्राने अतिशय आनंद झाला. आपण म्हणता की बादशहाकडून हुकूम येईपर्यंत राजकोटच्या रक्षणासाठी आपण हशमाची व्यवस्था करीत आहात. आणि कुलाबा आणि इतर किल्ले घेण्याचा आपला बेत आहे. ही फार उत्तम गोष्ट आहे. आपण लिहिले आहे की शंकरा नारायण (शंकराजी नारायण पंतसचिव) हा थोरप किल्ल्याच्या पायथ्याशी आला आहे. परमेश्वर करील तर त्याचा (शंकराजी नारायण) चांगलाच मोड करण्यात येईल.

(४२) **याकूतखान यास**- मला मन्सबीत पांचशेची बढती मिळाली. माझा मुलगा अबूमुहंमद याला तीनशे जात आणि शंभर स्वार सहामाहीच्या कराराने, अशी मन्सब, खिलतीचा पोशाख, रत्नजडित खंजीर, या गोष्टी मिळाल्या. याबद्दल आपण माझे अभिनंदन केले. आपल्या पत्राने अतिशय आनंद झाला.

अरबी घोड्यासंबंधी मी आपल्याला लिहिले होते. आपण लिहिता की या मोसमात जहाजांची ये जा होत नाही. पण काही माणसे घोडे आणतात आणि पांच-बडनेरच्या ठाण्याकडे नेतात. ते घोडे विकत घेण्यापूर्वी त्यांची पारख करून घ्यावी. त्यासाठी आपला एखादा चाबुकस्वार आल्यास बरे. म्हणजे तर आपल्याशिवाय जाणकर असा अश्वपरीक्षक कोण आहे. तर आपणच घोड्यांची निवड करावी. पांच उमदे आणि तरुण असे अरबी घोडे निवडावे. बादशहांना नजर करण्याच्या लायकीचे ते असावे. किंमत आपण ठरवून मला कळवावे म्हणजे मी रक्कम पाठवून देईन. — अपूर्ण

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, यांचे मासिक

वर्ष तेविसावे | अंक तिसरा

नवभारत

डिसेंबर १९६९

(महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पुरस्कृत)

संपादक-मंडळ

प्रा. वि. म. बेडेकर—प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. मे. पुं. रेगे का. संपादक

लो. टिळकांची राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना	तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी	१–४
लग्नगंधाराच्या निमित्ताने : कलानिर्मितीचे स्वरूप	सौ. प्रभावती हातवळणे	५–११
लिंगभेद आणि उत्क्रांति : १ :	श्री. अद्वयानंद गळतगे	१२–१६
पहिलें मराठी वर्तमानपत्र	श्री. अ. का. प्रियोळकर	१७–२०
मोगल मातबरखानाची अप्रकाशित पत्रे (१६८८–१७०५)	सेतु माधवराव पगडी	२१–२९
गुप्तकालातील एक समस्या–रामगुप्त : (लेखांक पहिला)	डॉ. वा. वि मिराशी	३०–३४
जगाचा अंत आणि वैज्ञानिकाचा दैववाद	श्री. मानवेंद्रनाथ रॉय- अनुवादक : बा. रं. सुंठणकर	३५–४२
पुराकथा आणि विधि-संकेत	डॉ. सदाशिव अंबादास डांगे	४३–५०
काही शब्दांच्या व्युत्पत्ती:– पूजा, मुंडा	श्री. म. अ. मेहेंदळे	५१–५४
चरित्रकार नामदेव	प्रा. सुग्राम पुल्ले	५५–५९
वाचकांचा–पत्रव्यवहार		६०–६१

वार्षिक रु. ९ सहामाही रु. ५ अंकास रु. १

हे मासिक श्री. म. शं. साठे यांनी दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई येथे छापून प्रा. वि. म. बेडेकर यांनी प्राज्ञपाठशाळामंडळ वाई यांचेकरिता तेथेच प्रसिद्ध केले.

पत्रव्यवहाराचा पत्ता : १ संपादकीय : कार्यकारी संपादक, 'नवभारत' मासिक,
२ व्यवस्थापकीय : व्यवस्थापक, 'नवभारत' मासिक,
C/o प्राज्ञ प्रेस, वाई (जि० सातारा)
३ चौकशी : श्री. बा. वि. कोनकर
१८८ एफ्, भीमरावबाडी, मुंबई २
फोन नं. ३५४८५४

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

श्री. सेतु माधवराव पगडी

मोगल मातबरखानाची अप्रकाशित पत्रे (१६८८-१७०५)

(४३) **दरबारांतील एका हितचिंतकास आपल्या-कडून पत्र आले नाही. पत्र पाठवावे.**

(४४) **वरील इसमास**- माझ्या वकीलाकडून कळले की बादशहाकडे मी अर्जी पाठविली होती ती त्यांच्या नजेरखालून गेली. माझ्या अर्जीवर विचार चालू आहे. आपली माझ्यावर कृपा आहे. ती तशीच चालू राहो.

(४५) **वरील इसमास**- अलीकडे आपले पत्र आले नाही. पत्र पाठवावे.

(४६) **वरील इसमास**– आपले पत्र मिळाले. आपण लिहिता की बादशाही नोकरीला आपण कंटाळलो. ती सोडून तुमच्याकडे निघून यावे असे वाटते. आपण आलात तर मला आनंदच होईल पण नोकरी सोडून दिल्याने आपल्या कुटुंबियांना कष्ट पडतील. तर आपण नोकरी सोडू नये. चालू ठेवावी. परमेश्वर करील तर कांही दिवसांनी आपली काळजी दूर होईल.

(४७) **वरील इसमास**– आपले पत्र मिळाले. आनंद झाला

(४८) **वरील इसमास**– येथील बख्शी मुहंमद हाशिम यास काही जरुरी कामासाठी पाठविले आहे. त्याचे काम करून द्यावे.

(४९) **वरील इसमास**– आपल्याकडून मुहंमद-ऐवजी हा इसम येऊन भेटला. त्याने आपला जो निरोप सांगितला याचे उत्तर त्याला तोंडी देण्यात आले आहे. ते तो आपल्याला कळवील.

(५०) **वरील इसमास**– आपले पत्र आले नाही. पत्र लिहून संतोषवावे.

(५१) **बख्शी मुखलिसखान यास**- आपण माझ्या-बद्दल आणि माझ्या कामगिरीबद्दल बादशहांना सांगितलेत आणि त्यामुळे माझ्या मन्सबींत पांचशे स्वार सशर्त होते. ते बिनशर्त करविलेत याबद्दल मी आपले कसे आभार मानावे हे मला कळत नाही. आपली अशीच कृपा माझ्यावर राहो.

(५२) **सदरस्सुदूर (न्यायाधीश) सियादतखान** यास आपल्या प्रयत्नामुळे मुख्लिसखान यांनी मला पांचशेस्वार बिनशर्तचा हुकूम मिळवून दिला आणि बख्शी बहरामंदखान यांनी मला नगाऱ्याचा मान मिळवून दिला आपली अशीच कृपा माझ्यावर राहो.

(५३) **मेहदीयार अलीबेग यास** माझ्या वकीलाच्या पत्रावरून प्रयत्नाने माझे काम (मन्सब आणि नगारे यांचा मान) लवकर झाले असे कळले. मी आपला फार आभारी आहे.

(५४) **हकीम मुहसिनखान यास**– आपण मीर मुहंमदसफीबद्दल शिफारस केली आहे. सय्यद लोकांची सेवा करणे हे मी आपले कर्तव्य समजतो. पण चौलचे बंदर हे माझ्या अधिकारक्षेत्राच्या बाहेर आहे. त्याचा संबंध फतेहजंगखान याच्याशी आहे.

सध्या मराठ्यांनी सगळीकडून धुमाकूळ माजविला आहे. माझ्यापाशी सैन्य थोडे आहे. तेसुद्धा ठाणी सांभाळण्यासाठी मला ठिकठिकाणी पसरून ठेवावे लागत आहे. अशा वेळी किल्ले आणि ठाणी रिकामी ठेवणे शक्य नाही. चौलच्या बंदरावर कमीत कमी तीनशे स्वार आणि एक हजार प्यादे हवेत. त्याशिवाय तेथील बंदोबस्त होऊ शकणार नाही. तेथील फौजदारी मिळाली तर कष्टाशिवाय काही निष्पन्न होणार नाही. तेथील दिवाणी, अमीनी आणि दारोगागिरी यांत अर्थ नाही. पण मीर मुहंमदसफीना यापैकी काय हवे आहे हे कळले तर त्याबद्दल मी अटोकाट प्रयत्न करीन.

(५५) **याकूतखान यास** (१६८९) आपले पत्र मिळाले आनंद झाला. मी कल्याणला आलो तरी आपल्याला कळविले नाही याबद्दल आपण आश्चर्य व्यक्त केले आहे. मी रजब महिन्याच्या सतरा तारखेस (एप्रिल अखेर १६८९) कल्याणला पोहोचलो आणि दुर्गाडीच्या किल्ल्याला वेढा घातला. किल्ला जिंकून घेतल्यावर आणि बंदोबस्त केल्यावर आपल्याला लिहावे असे ठरविले. पण कामामुळे जमले नाही. आपले पत्र

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मिळाले. आपण मुंबईवर चालून गेलात आणि इंग्रजांना वेढा घालून त्यांना चांगलीच शिक्षा केलीत आणि सरकारी कामगिरी पार पाडलीत हे ऐकून अतिशय आनंद झाला. हे अवघड काम आपल्या हातून पार पडले. आपण दोघे एकमेकाजवळ आहोत. शत्रूचा मोड होईल आणि या लोकाना काढून लावणे ठरल्यास तेही अंमलात आणता येईल. आपल्याला काही काम लागल्यास मला कळवावे. कल्याणचा प्रदेश उध्वस्त झाला आहे. आपल्याकडील व्यापाऱ्यांना धान्य आणि इतर जिन्नस इकडे आणून योग्य भावात विक्री करण्याची ताकीद करावी म्हणजे लष्करच्या लोकांची ओढाताण होणार नाही.

(५६) **मोतिमदखान यास**

माझ्या आणि मन्सबदाराच्या पथकाच्या तपासणीसाठी आणि घोड्याना डाग दिले किंवा नाही हे पाहण्यासाठी आपण पाठविलेले मीर इब्राहीम हे आले. त्यांनी सर्व गोष्टींची उत्तम प्रकारे तपासणी केली, आपण उत्तर हिंदुस्थानात जात आहात असे समजले. मीर इब्राहीन यांनी तपासणीचे सगळे कागदपत्र औरंगाबादेस पोहोचवावे असे आपण आज्ञा केल्याचे कळले. मीर इब्राहीम अजून दोन तीन महिने येथे राहिले असते तर बरे झाले असते. माझ्यापाशी तैनात झालेल्या सर्व मन्सबदाराची पथके हजर होती. मीर इब्राहीम हे अतिशय प्रामाणिक आहेत.

(५७) **फतेहजंगखान यास इ. स. १६९०.** आपले पत्र मिळाले. आपल्याला रायरी प्रांताची (रायगड) फौजदारी मिळाली आणि इस्लामगड (रायगड) किल्ल्यावर देखरेख ठेवण्याचे काम मिळाले. अशा अर्थाचे बादशहाचे फर्मान आले असे आपण कळविलेत याबद्दल आपले अभिनंदन. इंग्रजानी आपल्या अपराधाची क्षमा मागितली. आणि व्यापार आणि नष्ट केलेली जहाजे आणि मालमत्ता यांच्या बद्दल करारपत्र लिहून आणि बादशहानी त्यांच्या अपराधाची क्षमा केली आणि तुम्हाला आज्ञा केली की मुंबईचा वेढा तुम्ही उठवावा. तर बादशहाची आज्ञा मानली पाहिजे. आपण जे काम मनावर घेता ते घडून येते.

काजी मुहंमद सईद संबंधी आपण विचारले आहे. त्याबद्दल मी साष्टी बेटात चौकशी केली. ठाण्याच्या पाद्र्याला त्यांच्या (मुहंमद सईद) मुक्ततेसंबंधी लिहिण्यात आले. मला कळले आहे की काजी मजकूर यांची मुक्तता झाली आहे.

(५८) **बादशहाच्या बक्षींना पत्र– इ. स. १६९३** खानजहान बहादुर जफरजंग (दक्षिणचा सुभेदार बहादुरखान १६८०) याच्या काळातील वहिवाट अशी होती की ठाणेदार आणि किल्लेदार यांच्या पथकापैकी निम्मी पथके हलकरखान ऊर्फ वजीरबेग याजपाशी तैनात होती आणि बादशाही फौजेच्या दप्तरात त्यांची नोंद केलेली असे. बादशहा दक्षिणेत आल्यानंतर त्याच वहिवाटीस अनुसरून सुभेखानदेश आणि सरकार (जिल्हा) बागलाणा येथील ठाणेदार आणि किल्लेदार यांची निम्मी पथके दौलतमंदखानाबरोबर लोहोनेरच्या (बागलाणा) ठाण्यात राहू लागली. मराठे त्या भागाकडे वळले की बादशाही अधिकारी एकमेकाच्या सहकार्याने त्यांच्यावर चालून जात आणि त्यांचा मोड करण्यास झटत.

यावेळेस संगमनेरच्या ठाण्यात मराठ्यांचा प्रतिकार करून त्यांना त्या प्रदेशातून काढून लावू शकेल असे सैन्य नाही. ठाणेदारांना मराठ्यांचा प्रतिकार करणे कठीण आहे. त्यामुळे मराठे संधी साधून बालाघाटच्या परगण्यात पसरतात. त्यामुळे धामधूम होते आणि व्यापारी व प्रवासी यांना उपसर्ग पोहोचतो. गेल्या तीनचार वर्षापासून मी मराठ्यांचा मोड करण्यासाठी हातोदा (पाटोदा ?) परगण्यावर रघू मन्सबदार याला नेमले आहे. त्याच्याबरोबर चारशे स्वार आणि एक हजार पायदळ असे पथक दिले आहे. दरवर्षी मी त्याच्याकडे शंभर स्वार (डाग दिलेले सरकारी घोडे बाळगणारे) पाठवीत असतो. हेतु हा की त्या भागात चांगला बंदोबस्त राहावा.

संगमनेरचा महाल सुपीक आणि समृद्ध आहे. तो खालसा इलाख्यापैकी आहे. मराठ्यांच्या धामधुमीमुळे या महालाच्या उत्पन्नात अडथळे येतात आणि हानि होत आहे. मराठे सुभे खानदेश आणि सरकार बागलाणा या प्रदेशावर चालून जातात. तेव्हा त्यांचा मार्ग संगमनेर सरकार-(जिल्हा) च्या परगण्यातूनच आहे. संगमनेरचा ठाणेदार मुहंमदहादी हा आहे. त्या भागातील किल्लेदारांची आणि ठाणेदारांची निम्मी पथके संगमनेरला मुहंमद हादीपाशी तैनात करण्यात आली तर ते ठाणे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

मजबूत राहील. मराठे बादशाही मुलुखाच्या (खानदेश बागलाण) रोखाने जाऊ लागले की त्यांच्यावर इकडून रघू आणि तिकडून मुहंमदहादी हे आपली पथके घेऊन एकमताने त्यांचा मार्ग अडवून धरतील. आणि त्यांना धामधूम करू देणार नाहीत. मराठयांचा तो मार्ग बंद होईल. आणि बादशाही मुलखाची आबादानी होईल. बादशहांच्या पाशी आपण वस्तुस्थिति कळवाल अशी आशा आहे. हुजुराकडून सजावल (अंमलबजावणीचे अधिकारी) नेमण्यात यावे आणि त्यांच्याद्वारे संगमनेरच्या ठाण्यावर पथके तैनात करण्यात यावीत.

(५९) **फाजलखान यास**– बादशहाची पुढील-प्रमाणे आज्ञा झाली; "गुल्शनाबाद (नाशिक) आणि आसपासच्या परगण्यात शत्रूनी (मराठ्यांनी) मोठया संख्येने धामधूम चालविली आहे. चांगली फौज पाठविली नाही तर रयतेला त्रास सहन करीत बसावे लागेल. मातबरखानाला लिहिण्यात यावे की चांगले सैन्य आपल्या नायबाकडे पाठवावे म्हणजे त्या भागावर चांगली देखरेख ठेवता येईल."

गुल्शनाबाद भागात मराठे पसरले आहेत ही बातमी लागताच बादशाहाचा हुकूम येण्यापूर्वीच मी कल्याणहून सुसज्ज असे सैन्य पाठविले. सैन्याने मराठयावर हल्ला करून त्यांना चांगलीच शिक्षा केली. या विजयाची बातमी मी शाबान महिन्याच्या बावीस तारखेस बादशाहाकडे पाठविली. आपल्याला पण पत्रे पाठविली. सरकारी कामात मी कोणत्याही प्रकारे कसूर नाही. काही मोहीम निघाली की बादशहाच्या हुकुमाची वाट पाहात बसणे हे निमक हराम चाकराचे काम आहे.

(६०) **फाजलखान यास**– बादशहाची पुढील आज्ञा असल्याचे पत्र मिळाले. "सय्यद सदर आणि सय्यद हुसेन यानी पुढीलप्रमाणे दावा केला आहे. मातबरखानाच्या माणसानी आमचे घोडे आणि तलवारी आणि इतर वस्तू हिसकावून घेतल्या आहेत. आमची कुटुंबीय मंडळी वाड्यात आहेत. मातबरखानाचे अधिकारी काकाजी व महंमदशफी हे त्यांना त्रास देत आहेत. काझीहसन याच्याशी संगनमत करून त्यांनी मशिदीला आग लावली आहे. त्यांत काही सय्यद लोक जळून मेले. त्यांच्या मालमत्तेवर या लोकांनी कबजा केला असून त्यांचा वाडाही पाडून टाकला आहे. तर विनंति अशी की आमची मालमत्ता परत मिळावी आणि आम्हाला उपसर्ग देऊ नये म्हणून त्यांना ताकीद करण्यात यावी. आणि मशीद जाळण्याचे प्रकरण आहे याची चौकशी न्यायखात्याच्या अधिकाऱ्याकडून करविण्यात यावी.

सय्यद सदर आणि सय्यद हुसेन यांची दांडगाई आणि उद्धटपणा ही वर्णन करण्याच्या पलीकडे आहेत. ती थोडक्यात सांगतो. हे सय्यद वाटमाऱ्या करतात आणि लोकांना उपद्रव देतात. याबद्दल मजलिस होऊन महजर तयार झाला. त्यावर काजीची मोहर झाली. तो महजर हुजुरांकडे पाठविण्यात आला. त्यावर बादशहानी आज्ञा केली की सदर सय्यदांना उत्तर हिंदुस्थानात तैनात करण्यात यावे. पण हे लोक लबाड आहेत. हे अद्याप तिकडे गेले नाहीत. इतकेच नव्हे तर ते प्रौढी मिरवीत असतात. कुणीही त्यांच्या कबिल्याला त्रास दिला नाही आणि त्यांचे घोडे, शस्त्रे इत्यादी वस्तू घेतल्या नाहीत. ते लोक निश्चितपणे आपल्या वाड्यात राहात आहेत. त्यांनी आता जे आरोप केले आहेत त्यांत काही अर्थ नाही. मुहंमदशफी आणि काकाजी यांनी काजीहसन याच्याशी संगनमत करून मशिदीला आग लावली आणि सय्यद लोकांना जाळले असे हे लोक म्हणतात. हे धादांत खोटे आहे. काजी हसन आणि मुहंमदशफी हे तर मुसलमान आहेत. या गोष्टी त्यांच्या हातून कशा होऊ शकतील ?

या सय्यद लोकांनी गनी नावाच्या फकीरावर जबरदस्ती केली आणि त्याच्या जागेवर एक कबर आणि कबरीवर दर्गा ही बांधली. ही आपल्या आईची कबर आहे, असे ते म्हणतात. त्या वस्तूला ते मशीद म्हणू लागले. वास्तविक पाहता दर्गा म्हणजे लहान किल्लाच म्हणावा लागेल. या लोकांनी अनेक भिल्ल आणि कोळी चाकर म्हणून बाळगले आहेत. ते सर्व त्या गढीत राहातात. आणि वाटमाऱ्या करतात.

एक दिवस सय्यद हुसेन हा परगण्याच्या काजीला अद्वातद्वा बोलला आणि काजीच्या कचेरीत त्याने एका शिपायाला ठार मारले. यानंतर स्वतःच्या गढीत घुसून तो लढण्यास तयार झाला. माझा नायब मुहंमदशफी त्या ठाण्यावर आहे. त्याला आणि काजीला घेऊन शिपाई

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

माणसे त्यांच्याकडे गेली. पण त्यांनी लढण्यास सुरवात केली. त्यांनी काहींना ठार आणि काहींना जखमी केले ही हकीकत बादशहाना कळविल्यावर हुजुरानी हुकुम केला की सय्यद हुसेनला पायांत बेड्या घालून दरबारात हजर करावे. यासाठी एक गुर्जबर्दार नेमण्यात आला होता. ही गोष्ट महजरात नमूद करण्यात आली होती. आता यावर हुजुरांचा जो हुकुम होईल तो प्रदेशाच्या आणि लोकांच्या बंदोबस्ताकडे लक्ष देऊनच असेल.

(६१) **फजायलखान यास,** यापूर्वी सय्यद हुसेन आणि सय्यद सदर यांच्या दांडगाईची आणि बंडाळीची हकीकत मी बादशहाकडे लिहून कळविली होती. यावर बादशहानी आज्ञा केली होती की त्यांना उत्तर हिंदुस्थानात तैनात करण्यात यावे. पण सय्यदानी अजीजी करून तो हुकूम स्थगित करविला. ते हाडाचे दुष्ट आणि निमक हराम आहेत. ते गनिमांना (मराठ्यांना) मिळाले. मी पहिल्याच दिवशी बादशहांना कळविले होते तसेच घडून आले. गोष्टी या थराला गेल्या की हे लोक मराठ्यांना खानदेशांत आक्रमण करण्यासाठी मार्ग दाखवू लागले. सुभे खानदेशाच्या महालातून त्यानी बरीच लूट मिळविली. डांग, कोळवण, हतगड येथे ते पोहोचले. भिल्ल आणि कोळी यांना ते मिळाले. वणी (दिंडोरी) परगण्यातील खेडी त्यानी लुटली. वणीचा ठाणेदार अजीत याच्यावर ते चालून गेले. यानंतर त्यानी मराठे सरदारांना पत्र लिहिले की हा जिल्हा समृद्ध आहे. तुम्ही इकडे यावे. म्हणजे आपण एक होऊन हे परगणे लुटून काढू. वाकेनविसांच्या बातमीपत्रावरून ही हकीकत हुजुराना कळली आहे. या भागात अशी धामधूम असूनही मी बादशाही इलाख्याच्या रक्षणासाठी आणि मराठ्यांचा मोड करण्यासाठी सुसज्ज असे सैन्य बालाघाटावर पाठविले. पण या हरामखोरांच्या— (सय्यदांच्या) मुळे मला त्या जिल्ह्याच्या (वणी, डांग वगैरे) सुरक्षिततेची काळजी वाटते. कोळ्यांशी एक होऊन ते त्या भागांत मोठे बंड घडवून आणतील की काय अशी शंका वाटते.

डांगचे कोळी तिकडील जमीनदार अब्दुल्करीम याच्या सांगण्याप्रमाणे वागतात. माझी विनंति अशी की बादशहानी गुर्जबर्दार पाठवून अब्दुल्करीमला हुकुम पाठवावा की अब्दुल्करीमने बंडखोरांना ठार मारावे अगर कैद करावे. म्हणजे बंड मोडेल. आणि सय्यदाना पाय रोवण्यास संधी मिळणार नाही. जर का त्यांना सैन्य जमविण्याची संधी मिळाली तर न जाणो ते तिकडील किल्ल्यांपैकी एखादा किल्ला घ्यावयाचे आणि मग त्यांचा मोड करणे लांबणीवर पडेल.

(६२) **मुख्तारखान यास** मी बादशहांना विनंति केली ते पत्र हुजूरात देणे बरोबर नाही असे आपण लिहिता. मी बादशहाची चाकरी बजावण्यात काही कमी पडू देत नाही. मला मन्सब कमी असली आणि सरंजामही पुरेसा नसला तरी मी बादशहांनी सांगितलेली सगळी कामे पार पाडली आहेत. किल्ले जिंकून घेण्यात मला पुष्कळ खर्च आला, ठाणी संभाळण्यासाठी मी नियमापेक्षा अधिक पथके चाकरीत घेतली, जहागिरीचे उत्पन्नही कमी आले यामुळे मी कर्जदार झालो. इतर लोकांप्रमाणे मीही नोकरीला लाभाचे साधन समजलो असतो तर माझा सरंजाम चांगलाच राहिला असता. साधनसामुग्री मिळाल्याशिवाय इकडचा बंदोबस्त कठीणच. इकडच्या पुंडाई करणाऱ्यांचा (मराठे) मी कितीदा तरी मोड केला आहे असे असूनही ते डोंगरकपारीतून राहून आमचे किल्ले घेण्याच्या विचारात असतात. आणि साधनसामुग्रीशिवाय किल्ला म्हणजे निरर्थक गोष्ट होय. खानाने (कोणी किल्लेदार असावा) बंदोबस्त चांगला राखला असला तर माझी आवश्यकता काय. तसे नसेल तर मला माझ्या नोकरीची चाड बाळगणे प्राप्त आहे.

(अमक्या अमक्याचा बंदोबस्त बरोबर नाही असे लिहिल्यामुळे मातबर खानाला टपका मिळालेला दिसतो)

(६३) **खानजहान बहादुर जफरजंग बहादुरखान यास**— आपण या भागात येणार असल्याचे कळून आनंद झाला.

(६४) **कुणाला तरी (बहुतेक जुल्फिकारखान असावा) मीरबक्षीगिरी मिळाल्याबद्दल अभिनंदन** आपल्याला मीरबक्षीगिरीचा हुद्दा मिळाला याबद्दल अभिनंदन

(६५) **वरील इसमास** बक्षीगिरी आणि मन्सबीची वाढ याबद्दल अभिनंदन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

(६६) वरील इसमास (वरील प्रमाणे)

(६७) वरील इसमास (वरील प्रमाणे)

(६८) **अहेराचे पत्र** आपल्या घरांत लग्न कार्य ठरले. आहे. हे कळून आनंद झाला. अहेर पाठवीत आहे. स्वीकार व्हावा.

(६९) **भेट पाठविल्याबद्दल आभार** आपल्याकडून खिलत आणि घोडा या वस्तू भेट म्हणून आल्या याबद्दल आभारी आहे. या भागांत आपले काही काम असल्यास आज्ञा व्हावी. ते आनंदाने करीन.

(७०) **वरील इसमास आभाराचे पत्र**

(७१) **दियानतखान यास (एक पोर्तुगीज मुसलमान होतो)** दुली कलायुरीक नांवाचा पोर्तुगीज इसम आहे. हा प्रतिष्ठित घराण्याचा आहे. पोर्तुगालच्या राजाकडून या इसमाला वसई प्रांतांत काही खेडी आणि बागा या इनाम म्हणून मिळाल्या होत्या. हा इसम कल्याणला आला आणि मुसलमान झाला. त्याचें नांव अब्दुल्हादी ठेवण्यात आले. वसईच्या पोर्तुगीज अधिकाऱ्याला हे कळल्यावर त्याने या इसमाची मालमत्ता आणि इस्टेट ही जप्त केली. या इसमाचे समाधान करणे अगत्याचे आहे. यांत इस्लामचा उत्कर्ष आहे. म्हणून मी या इसमाला वतान हे खेडे त्याला देण्याची तजवीज केली आहे. म्हणजे तो तेथे राहील. आपण योग्य वेळ पाहून बादशहाच्या कानावर ही गोष्ट घालावी आणि सदर इसमाला मी तजवीज केलेले खेडे इनाम म्हणून देण्यात यावे अशा अर्थाचे फर्मान निघेल असे करावे. हे मोठे पुण्याचे काम आहे.

(७२) **एका सरदारास १७०२.** आपले पत्र मिळाले त्यांत आपण पुढीलप्रमाणे कळविले आहे : " आम्ही बहादुरगडाहून मोहिमेवर निघालो. वऱ्हाड, चांदा आणि रामगीर अशी ही मोहीम होती. या जिहादमधे आम्ही काफरांना मार दिला आणि त्यांचा पाठलाग केला. हैद्राबाद शहराला त्यांच्या कडून आम्ही उपसर्ग लागू दिला नाही. मराठे भीमा पार करून जाऊ इच्छीत होते. आम्ही त्यांच्यावर तुटून पडलो. मराठ्यांनीं प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आमची हरावल टेहेळणीची पथके, हरावल, आघाडी, मैमना आणि मैसरा उजवी आणि डावी फळी यांच्यावर हल्ले केले. शेवटी मराठ्यांचा पराजय झाला. आमची फार मोठी फत्ते झाली. मराठ्यानीं जे काही हस्तगत केले होते ते परत आमच्या हाती लागले. " आपलें या अर्थाचे पत्र योग्य वेळी मिळाले. नबाबसाहेब विजय संपादून बहादुरगडला आले असे कळले. परमेश्वर आपल्या सैन्याला असेच विजय मिळवून देवो.

(७३) **अभिनंदनाचे पत्र.** आपल्या सैन्याने हरसलचा किल्ला जिंकून घेतला. किल्ल्यातील लोक शरण आले. असे आपल्या पत्रावरून कळले, आनंद झाला.

(७४) **अभिनंदनाचे पत्र.** आपल्या सैन्याने नेरेलचा किल्ला जिंकून घेतल्याचे कळले. आनंद झाला.

(७५) **माहुली किल्ल्यासंबंधी–** मी बादशहांना पुढीलप्रमाणे कळविले होते.

" माहुलीचा किल्लेदार जैनुद्दीन अलीखान याला माहुलीचे हवापाणी सोसत नाही. तो आजारी आहे. त्याच्याऐवजी इतर कुणाची तरी किल्लेदार म्हणून नेमणूक करावी. " यावर बादशहानी पुढीलप्रमाणे आज्ञा केली.

" तुम्ही आपल्या बरोबर तैनात असलेल्या माणसापैकी कुणाचे तरी नांव सुचवून कळवावे. "

खानसाहेब, माझ्यापाशी तैनात असलेल्या फौजेतील बहुतेक मन्सबदार मराठे आहेत. ते विश्वासास योग्य नाहीत. बादशहाकडून तैनात झालेले जे दोन मन्सबदार आहेत ते नादार आहेत. त्यांची परिस्थिति शोचनीय आहे. त्यांच्याकडून किल्लेदारीचे काम होणे कठीण. शिवाय या गोष्टीला तेही कबूल नाहीत.

जैनुद्दीन अलीखान माहुलीचा किल्ला सांभाळीत आहे. पण त्याच्याकडून किल्ला सांभाळणे होत नसावे. किल्ला प्रचंड आहे. किल्लेदाराची मन्सबही लहान आहे. किल्ल्याच्या संरक्षणासाठी त्याने नियमापेक्षा अधिक माणसे बाळगली. त्यामुळे तो कर्जदार झाला आहे.

याशिवाय माहुलीवर एक मोठा अपघात झाला. तेथील कोठारात आग लागून त्यांतील सर्व काही जळून खाक झाले. यामुळे जैनुद्दीन अधिकच चिंताग्रस्त झाला. त्याने मला लिहिले की येथील हवापाणी मला मानवत नाही. मी आजारी असतो. त्याच्या सांगण्यावरून मी पत्र लिहिले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

यानंतर मी चौकशी केली. मला आढळून आले की जैनुद्दीन अलीला आजारबिजार काही नाही. केवळ किल्ल्यावरून निघून यावे यासाठी त्याने आजाराचे निमित्त केले आहे.

जैनुद्दीन अलीला माहुली किल्ल्याची चांगली माहिती आहे. या धामधुमीच्या काळात त्याला बदलणे योग्य होणार नाही. आपण बादशहांच्या कानावर ही हकीकत घालावी आणि जैनुद्दीन अलीच्या मन्सबीत वाढ करावी म्हणजे तो त्याची परिस्थिति सुधारून तो मनःपूर्वक काम करू लागेल.

(७६) **माहुलीसंबंधी–** मी बादशहांना पुढील प्रमाणे कळविले होते.

" किल्ले माहुलीच्या चौक्यासाठी हशमाची आवश्यकता आहे. " यावर बादशहानी पुढीलप्रमाणे आज्ञा केली.

" किल्ल्याच्या पायथ्याशी आपण राहावे असे तुम्हाला वाटत असेल तर तशी तुमची तैनाती करता येईल. तूर्त तोफखान्याच्या दारोग्याचे हशम तेथे तैनता करण्यात यावे. "

वस्तुस्थिति अशी आहे की माहुलीच्या वरच्या भागांत हजार गजाची मोठी वाट आहे. व चौऱ्याऐंशी लहान वाटा (नाली) आहेत. यापैकीं कोठूनहि किल्ल्यावर जाता येते. शिवाजीच्या काळांत किल्ल्याच्या टोकावर दोन हजार शिपायांचे पायदळ असे. किल्ला आणि पायथा यांच्या मधोमध चौक्या असत त्यावर एक हजार पायदळ तैनात असे. अद्यापि चौक्यांच्या भिंती उभ्या आहेत. अशाच चौक्या कायम केल्या नाहीत तर किल्ल्यांची खात्री देता येत नाही. पायथ्याच्या चौक्याशिवाय किल्ल्याच्या वरच्या भागाची देखरेख निरर्थक आहे. पावसाळ्यांत तर जवळचेहि दिसत नाहीं. अंधाऱ्या रात्री तर हाताला हाताची ओळख पटत नाहीं. अशावेळी किल्ल्याच्या पायथ्याशी काय चालले आहे हे कसे समजणार.

म्हणून चौक्यांसाठी पाचशे माणसे तरी अगदी आवश्यक आहेत. आपण योग्य वेळी बादशहांच्या कानावर ही हकीकत घालावी आणि चौक्यांसाठी हशमाच्या तैनातीची व्यवस्था करावी.

(७७) मशिदींच्या दुरुस्तीसंबंधी बादशहांनी पुढीलप्रमाणे आज्ञा केली आहे. " सय्यद कुतबुद्दीन सज्जादानशीन यांनी पुढीलप्रमाणे अर्ज केला आहे : " नर्कवासी संभाजी याने धर्मद्वेषामुळे तळकोकणचे मद्रसे आणि मशिदी उध्वस्त केल्या. मी (कुतबुद्दीन) दोन जुम्मामशिदी आणि एक मद्रसा ही दुरुस्त केली आहेत. पण इतर मद्रसे आणि जुम्मामशिदी हे अद्याप नामशेष आहेत. इकडील पाऊस तर सर्वांना माहीत आहे. एखाद्या प्रामाणिक अधिकाऱ्याला हुकूम व्हावा की काळजीपूर्वक रक्कम खर्चून पवित्र इमारती दुरुस्त कराव्या. म्हणजे बादशहांच्या साहाय्याने ठिकठिकाणी मशिदी आणि मद्रसे (धार्मिक शिक्षण देणाऱ्या शाळा) चालू होतील. "

तर तुम्ही त्या भागातील मशिदींच्या परिस्थितीवर रिपोर्ट पाठवावा. वस्तुस्थिति अशी आहे की पूर्वी या भागात मुसलमानांची वस्ती बरीच होती. कसब्यातून मशिदी व मद्रसे ही होती.

मराठ्यांच्या धामधुमीच्या काळात हा भाग पूर्णपणे उजाड झाला. काफराने (संभाजी) सगळ्या मशिदी पाडून टाकल्या. आता परमेश्वरकृपेने हा प्रदेश बादशहांच्या ताब्यात आला आहे. मुसलमान विद्वान आणि धर्मशास्त्रज्ञ परागंदा झाले होते. ते परत आपापल्या गावी आले आहेत. कल्याण, इस्लामाबाद ऊर्फ भिवंडी, पनवेल, आणि शेणोला या ठिकाणी मुसलमान वस्ती बरीच आहे. येथे मशिदी आणि मद्रसे असणे योग्य आहे. आपण बादशहांना हे कळवून हे कार्य होईल असे करावे. हे काम सय्यद कुतबुद्दीनच्या देखरेखीखाली करविण्यात यावे. मनुष्य विद्वान आणि साधुवृत्तीचा आहे. तो व्यवस्थितपणे आणि काटकसरीने हे काम पार पाडील.

(७८) **शिफारस** (१६९५–९६) महमूदबेग चकणी याचा पुतण्या हमजाखान मरहूम हा होता. त्याचा जावई कासिमबेग हा माझ्या फौजेत तैनात आहे. त्याला दीडशे (जात)ची मन्सब आहे. हा मनुष्य तरुण आणि कामाचा आहे. गेली सात वर्षे तो माझ्याबरोबर आहे. त्याने अनेक कामगिऱ्या बजावल्या. सिद्धगड किल्ला जिंकून घेण्याच्या कामात त्याने बरीच मेहनत केली. जुलूस सदुतीस (इ. स. १६९३) मध्ये

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका

गुल्शनाबाद (नाशिक) येथे मराठ्यांशी लढाई झाली. अलीकडे (१६९५) पाटोदा परगण्यातील मनमाड जवळ मराठ्यांशी लढाई होऊन त्यांचा मोड झाला- या मोहिमात त्याने चांगली कामगिरी बजावली. ते वृत्त मी हुजुरात पाठविले आहे. कासिमबेग या धामधुमीच्या प्रदेशात आहे. त्याच्या कुटुंबियाची संख्या मोठी आहे. कासिमबेग नेहमी फौजेत राहातो. धान्याची महागाई, लहान मन्सब यामुळे त्याला खर्चाची तोंडमिळवणी करता येत नाही. त्याची परिस्थिति वाईट आहे. ही हकीकत योग्य वेळ पाहून हुजुरांच्या कानावर घालावी. त्याच्या मन्सबीत पन्नास (जात) आणि आठ स्वार अशी वाढ करण्यात यावी. म्हणजे त्याला अधिक कामगिरी करून दाखविण्यास उत्साह येईल.

(७९) **मीर मुहंमद फाजिल बद्दल शिफारस** बदख्शान प्रांताचा रहिवासी मीर मेहदी याचा पणतू, मीरकासिमचा नातू, आणि मीर मुहंमद ताहिर याचा मुलगा मीर मुहंमद फाजिल हा काही सय्यदांना बरोबर घेऊन माझ्यापाशी आला. त्याने अनेक सरकारी कामगिऱ्या मेहनतीने पार पाडल्या आहेत. हा इसम प्रतिष्ठित कुळातील असून सय्यद आहे. बाबर बादशहानी याच्या पणजाला बदख्शान प्रांताच्या सरदाराच्या हुद्यावर नेमले होते. ती सनद याच्यापाशी आहे. योग्य वेळ पाहून आपण हुजुरांना ही हकीकत सांगावी आणि त्याला योग्य अशी मन्सब मिळवून द्यावी.

(८०) **वलीदाद किल्लेदाराची शिफारस** १६९८, मरहूम लोधीखान याचा मुलगा वलीदाद हा पट्टा किल्ल्याचा किल्लेदार आहे. तो तरुण आणि तडफदार आहे. तो किल्ल्याची व्यवस्था उत्तम राखीत आहे. किल्ल्यावर त्याने नियमापेक्षा अधिक शिबंदी बाळगली आहे. रसदेचा पुरवठाहि त्याने चांगला करून ठेवला आहे. त्याला मन्सब लहान आहे. यामुळे त्याला कर्ज झाले आहे. पूर्वीचे किल्लेदार मोठया मन्सबीचे होते. असे असूनहि त्यांना किल्ल्याची अशी व्यवस्था ठेवता आली नाही.

अलीकडे मी मराठ्यांचा मोड करण्यासाठी बालाघाटावर गेलो होतो. त्यावेळी वलीदादने आपला भाऊ ताज मन्सबदार याला शंभर स्वार आणि दोनशे प्यादे बरोबर देऊन माझ्यापाशी तैनात केले. ते पथक चार महिने माझ्या सैन्यात होते, त्यांनी चांगली कामगिरी बजावली. रमजानच्या महिन्यात (१६९८) आमच्या सैन्याने औरंगाबादेपर्यंत मराठ्यांचा पाठलाग केला. त्यावेळीही या पथकाने चांगली कामगिरी बजावली. आपण योग्य वेळ पाहून बादशहाना हे कळवावे आणि वलीदादच्या मन्सबीत योग्य ती वाढ करवावी.

(८१) **केशवदासच्या नातवाची शिफारस १६९८.** केशवदास शिसोदिया हा माझ्या फौजेत तैनात होता. त्याला अडीचशे जात आणि ऐंशी स्वार अशी मन्सब होती. मी त्याला भिवंडीच्या ठाण्यावर नेमले होते. त्याने तेथे उत्तम बंदोबस्त राखला होता. तो अलीकडे वारला. त्याचा मुलगा शिवदास याचा मुलगा बख्तसिंग हा तरुण असून तडफदार आहे. तो भिवंडीच्या ठाण्याचा बंदोबस्त पाहात आहे. आपण बादशहांना सांगून केशवदासाची मन्सब बख्तसिंगाच्या नावे करवावी आणि भिवंडीच्या ठाण्यावर त्याची नेमणूक करवावी.

(८२) **हकीमाच्या नेमणुकीविषयी**— निजामुल्मुल्की कोंकणचे (कल्याण भिवंडी प्रांत) हवापाणी किती वाईट आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. या प्रदेशात अनेक प्रकारचे भयंकर रोग उद्भवत असतात. येथे कोणी हकीम नसल्यामुळे रोग्यांवर उपचार होऊ शकत नाही. फौजेतील नोकर आणि इकडील माणसे नेहमी रोगग्रस्त असतात.

अलीकडे हकीम हबीबुल्ला किरमानी याचा मुलगा हकीम मुहंमद मुहसिन हा स्वदेशातून (इराणहून) सुरतेला आला होता. त्याच्या हकीमीची प्रसिद्धी चहूकडे पसरली. हे ऐकून मी त्याला माझ्याकडे बोलाविले. तो कल्याणला आला. त्याने इकडे औषधोपचार सुरू केले. त्याच्या उपचाराने लोकांना गुण येऊ लागला. असा मनुष्य कल्याणला असणे आवश्यक आहे. आपण योग्य वेळ पाहून हुजुरांच्या कानावर ही गोष्ट घालावी. हकीमाला दोनशे जातची मन्सब मिळावी. मन्सबीची रोख रक्कम कल्याणच्या सरकारी खजिन्यांतून त्याला मिळण्याची व्यवस्था व्हावी. म्हणजे तो आपले काम उत्तम प्रकारे करू शकेल.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

(८३) **लोणकर्ण ऊर्फ अब्दुल्लतीफ** यासंबंधी **१६९८.** आज त्या गोष्टीला नऊ वर्षे झाली. शेखहिदायतुल्ला (हा पूर्वी हिंदु होता) हा सरकारी घोड्यांना डाग दिले आहेत की नाही हे पाहाण्याच्या कामावर मुश्रफ (अधिकारी) होता. तो आणि त्याच्या मुलगा लोणकर्ण हे माझ्याकडे आले. आणि त्यांनी मुसलमान होण्याची तयारी दाखविली. मी हुजुरांत विनंति केल्यावर यार अलीबेग यांनी त्यांना हुजुरांत बोलाविले. तेथे त्यांनी इस्लाम धर्माचा स्वीकार केला. त्यावेळी लोणकर्ण याला नुक्तीच मिश्रुड फुटू लागली होती. बादशहांनी हुकूम दिला की सध्या याला शिक्षण देण्यात यावे. नंतर याला मन्सब देण्यात येईल. त्याने आता कुराणाचे शिक्षण घेतले आहे. त्याचे अक्षरहि चांगले आहे. तो आता एक वर्षापासून बादशाही छावणीत आहे. खर्चामुळे त्याला कर्ज झाले आहे. त्याला योग्य अशी मन्सब मिळावी.

(८४) **नेमणुकीचा हुकूम.** सय्यद कुतुबुद्दीन हा कोकणप्रांताचा सज्जादानशीन आहे. त्याचा सख्खा भाऊ सय्यद नूरुद्दीन मुहंमद हा आहे. तळकोंकणचे सदर आणि मुहतसिब या जागेवर नेमणूक व्हावयाची होती. सदरुस्सुदूरच्या कचेरीतून खैरुल्ला तुराणी नावाच्या इसमाला पाठविण्यात आले. त्याला दीडशे स्वारांची मन्सब होती. तीत पन्नास स्वारांची वाढ करण्यात आली. पण हा इसम या भागाला अगदी नवखा होता. त्याच्या ऐवजी कोंकणचे रहिवासी मुहंमदसिद्दीक आणि शेख अब्दुल्कादर यांची नावे पाठविण्यात आली. यावर हुजुरांची आज्ञा झाली की दोघा पैकी एकाची निवड करुन नाव पाठवावे. ते राजी नाहीत. आणि जागा रिकामी आहे. म्हणून सय्यद नूरुद्दीन मुहंमद याचे नाव पाठवीत आहे. त्याला कसेबसे राजी केले आहे, तो काम पाहू लागला आहे. त्याला योग्य ती मन्सब देण्यात यावी.

(८५) **मोहनसिंग संबंधी (१६९५)** स्वरूपसिंगाचा मुलगा मोहनसिंग हा माझ्यापाशी तैनात आहे. गुलशनाबाद (नाशिक) येथे मराठ्यांशी लढाई झाली. तीत त्याने चांगली कामगिरी बजावली. मनुष्य शिपाई बाण्याचा असून तडफदार आहे. त्याला पाचशे (जात) आणि दोनशे स्वार अशी मन्सब देण्यात यावी.

(८६) वकीलपत्र. जुलूस सेहचाळीस, जिल्कादच्या पंधरा तारखेस (दोन एप्रिल १७०२) सय्यद हाफिज वगैरे अहदी हे कल्याण ठाण्याच्या महकमे शरैया (न्यायखात्याची कचेरी) येथे रुजू झाले. त्यांनी सांगितले की आमचा पगार सुरत बंदर येथून मिळतो. त्यासंबंधी कार्यवाही करण्याचे अधिकार आम्ही सुरतेचा रहिवासी शेख याकूब याचा नातू, आणि शेख मुसाचा मुलगा शेख अबुलमुआली याला या वकीलपत्राने देतो. साधा पुरावा घेऊन वकीलपत्र प्रमाणित करण्यात आले.

(८७) **वारसाचा हुकूम (सक्सेशन सर्टिफिकेट)** हिज्री १११४ सफर महिन्याच्या पाच तारखेस (वीस जून १७०२) चंद्रसेनाचा नातू आणि मित्रसेनाचा मुलगा उग्रसेन हा महकमे शरैया (न्यायालयात) येथे रुजू झाला. त्याने सांगितले की हिरामण जमादार मरण पावला. तो माझा सख्खा भाऊ होता. माझ्याशिवाय त्याला कोणी वारस नाही. साक्षीपुरावा घेऊन तशा अर्थाचा विरासतनामा (वारसापत्र) त्याला देण्यात आले.

(८८) **जामिनकीचा– करारनामा** यांत करारनाम्याचा नमुना दिला आहे.

(८९) **पुत्रजन्माबद्दल अभिनंदन (१७०१)** जैनुद्दीन अलीखान याला मुलगा झाला. त्याबद्दल अभिनंदन

(९०) **मुलगी झाल्याबद्दल अभिनंदन** जैनुद्दीन अलीखानाला मुलगी झाली. त्याबद्दल अभिनंदन

(९१) **दुखवटा, मुलगा वारल्याबद्दल** कुणाला तरी दुखवट्याचे पत्र

(९२) **दुखवटा**

(९३) **दुखवट्याचे उत्तर**

(९४) **दुखवटा**

(९५) **दुखवटा**

(९६) **कुणाची आई वारल्याबद्दल दुखवटा** येथे जेठमलने आपले पुस्तक संपविले आहे. तो म्हणतो–

१११६ हिज्री आलमगीरी जुलूस ४९ शाबान महिन्याची चोवीस तारीख (तीस नोव्हेंबर १७०५) कसबे कल्याण येथे मी हा ग्रंथ लिहून संपविला.

तोपर्यंत मातबरखानाचा मृत्यु झाला असावा. ग्रंथात पुढे जेठमलने आपल्या स्वरचित कविता दिल्या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थाद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

आहेत. मातबरखानाच्या मृत्यूनंतर बादशहाचा वजीर मोमीनखान याने मातबरखानाचा मुलगा आबू मुहंमदखान याला दुखवट्याचे पत्र धाडले. ते आणि त्याला अबूमहंमदखानाने दिलेले उत्तर (हे उत्तर जेठमलने तयार केले) ही या ग्रंथाच्या शेवटी घातली आहेत.

समारोप

वरील पत्रे अभ्यासून पाहता मोगल-मराठा संघर्षाबद्दल पुढील माहिती मिळते.

(१) संभाजी कैद होण्याच्या एकवर्षा पूर्वीपासून मराठयांचे नाशिक बागलाणातील किल्ले मोगलाच्या हाती पडू लागले होते. १६८६ च्या अखेरीस साल्हेरचा किल्ला असूजी किल्लेदार याने मोगलाकडून मन्सब स्वीकारून, त्यांच्या हवाली केला, मातबरखानाने त्र्यंबकचकिल्ला श्यामराज आणि तेलंगराव यांना मन्सब आणि रोख रक्कम देऊन आपल्या ताब्यात घेतला. एक पट्टा किल्ला तेवढा हल्ला करून घेतलेला दिसतो. त्र्यंबक आणि इतर किल्ले घेण्यात आपल्याला एक लाख वीस हजाराचे कर्ज झाले असे मातबरखान लिहितो. माहुलीचा किल्ला मोगलाना दिल्याबद्दल किल्लेदार द्वारकोजी याला अडीच हजार अश्रफ्या मिळाल्या.

इ. स. १६९१ नंतर परिस्थिति पालटू लागली. पोर्तुगिजांनी मराठयांच्या कबिल्यांना आश्रय दिला. १६९३ पासून मराठे संगमनेर वरून खानदेशात आक्रमणे करू लागले. वरील पत्रात नाशिक, (१६९३), मनमाड (१६९५) सिन्नर, फुलंब्री, इत्यादि ठिकाणच्या लढायांचे उल्लेख आढळतात. मराठे सरदारांत शंकराजी नारायण (सचिव), हणमंतराव निंबाळकर. धनाजी जाधव, दामाजी, खंडोजी कदम इत्यादींची नांवे आढळतात.

मातबरखानाच्या अधिकाऱ्यांत बरेच मराठे होते, काकाजी नाईक, रघूजी, रंगोजी, गोविंदराव, आवजी आढळ, राजाराम, जव्हारचा राजा विक्रम श्रीपत ही नांवे आढळतात. पण एकंदरीत पाहता मोगलांना मनुष्यबळ कमी पडत असावे. मोगलांनी मराठयांना मन्सबी दिल्या तरी त्यांना किल्लेदारी दिली नाही. ते विश्वासार्ह नाहीत असे मातबरखानाने म्हटले आहे. मोगल अधिकाऱ्यांना मन्सब कमी आणि खर्च जास्त यामुळे ते सदा कर्जबाजारी असत. रोख बक्षिसे देण्यांत औरंगजेब फार सावध दिसतो. मातबरखानाने मागितले एक लाख वीस हजार. औरंगजेबाने तीस हजार देण्याची आज्ञा केली. ती रक्कमहि मिळत नाही अशी मातबरखान तक्रार करतो.

लहान सहान गोष्टीतहि लक्ष घालण्याची औरंगजेबाची संवय वरील पत्रांतून दिसून येते. मातबरखानाने मराठयांवर चालून जाण्यासाठी आपल्याला बालाघाटाकडे जाऊ द्यावे म्हणून परवानगी मागितली. त्याला सांगण्यात आले की तुम्ही आपल्या जिल्ह्याच्या हद्दीत कोठेंहि तळ देऊ शकता.

शेवटी मातबरखान मराठयांना आपल्या उत्पन्नाचा तिसरा भाग देऊ लागला. याचा उल्लेख अर्थात त्याच्या पत्रांत नाही. ही गोष्ट इंग्रजी साधनांवरून उघडकीस आली.

अद्याप अप्रकाशित असलेली ही पत्रे कोकण आणि नाशिक या प्रांतांतील मोगल-मराठा संघर्षाच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरावीत.

महाराष्ट्रांतील दुष्काळ व त्यावरील उपाययोजना

लेखक-**चा. अ. दाभोलकर**

किं. २ रुपये

प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई (सातारा)

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
नवभारत ७५ अमृतमहोत्सवी वर्ष
द्वारा प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई

अनुक्रमणिका